म. ग्रं. सं. ठाणें

| | | |
|---|---|---|
| विषय | लेखक चिं. गं. गोगटे. | सन |
| चरित्र | | १८९४ |
| संग्रहालय क्रमांक ७० | पुस्तकाचें नांव बाळाजी विश्वनाथ पेशवे. | |
| १९३ | १९३ चरित्र | |

१° बाळाजी वि. पेशवे

(चरित्र)

इ. स. १८७७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. २९३.

# [redacted] विश्वनाथ पेशवे

## यांचें चरित्र.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

चिंतामण गंगाधर गोगटे.

किंमत ४॥ आणे.

म. ७०८

# बाळाजी विश्वनाथ पेशवे

## यांचें चरित्र

हें पुस्तक

**चिंतामण गंगाधर गोगटे,**

'छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचे चरित्रा' चे कर्ते

यांनीं लिहिलें.

पुणें.

पेठ शुक्रवार येथें सत्यप्रकाश छापखान्यांत छापिलें.

शा० श० १८१६.—इ० स० १८९४.

ह्या पुस्तकासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत ४॥ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

# प्रस्तावना

सांप्रत मराठी भाषेंत तयार होणाऱ्या ग्रंथांची एकंदर संख्या पाहूं गेलें तर त्या मानानें ऐतिहासिक ग्रंथांची फारच उणीव आढळून येते. परंतु अलीकडे कांहीं विद्वान् मंडळीचें या शोचनीय स्थितीकडे लक्ष पोहोंचून बऱ्याच ऐतिहासिक ग्रंथांचा आपणांस लाभ होऊं लागला आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. तथापि अद्याप श्रीमंत पेशव्यांच्या घराण्यापैकीं कोणत्याही पुरुषाचें ऐतिहासिकरीत्या चरित्र लिहिलें न जावें ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे.

ज्या पुरुषानें स्वतःच्या पराक्रमावर अष्टप्रधानपदांपैकीं मुख्य पेशवे-पद संपादन केलें; ज्यानें गृहकलहामुळें जर्जर झालेला शाहू-महाराजांचा पक्ष प्रसंगविशेषीं लढाया देऊन व प्रसंगविशेषीं मुत्सद्दीपणाची अक्कल लढवून जोरांत आणला; ज्यानें दिल्लीपती-पासून चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य या हक्कांच्या महत्त्वाच्या सनदा मराठ्यांस आणून दिल्या; ज्यानें उत्तरहिंदुस्थानांतील रजपूत राजांशीं सख्य करून मराठ्यांच्या पुढील राज्यविस्ताराचा मार्ग सुलभ करून दिला; ज्यानें अश्रांत परिश्रम करून मराठी राज्याच्या जमाबंदीची शिस्त भक्कम पायावर घालून दिली; त्या थोर पुरुषाचें चरित्र यापूर्वींच प्रसिद्ध होणें इष्ट होतें. असो.

हें बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र जुन्या बखरी, काव्येतिहाससंग्रहांत दिलेली माहिती व कांहीं इंग्रजी ग्रंथांत दिलेली

माहिती यांच्या आधारानें मीं तयार केलें आहे. बाळाजीपंतांच्या पूर्ववयांतील हकीकत मुळींच उपलब्ध नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. परंतु या गोष्टीस इलाज नाहीं. ह्या पुस्तकांत दिलेल्या माहितीहून ज्यास्त माहिती कोणाजवळ असेल व मेहेरबानीनें ते ती मला देतील तर या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघण्याचा प्रसंग आल्यास तिचा मी मोठ्या आनंदानें उपयोग करीन.

कांहीं दिवसांपूर्वीं छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र मीं लिहून प्रसिद्ध केलें त्यास सरकारांतून व इतर लोकांकडून चांगला आश्रय मिळाला. त्यामुळें मला उत्तेजन येऊन, पेशवे-घराण्यांतील थोर पुरुषांच्या भावी चरित्रांच्या सांखळीचा हा पहिला दुवा मीं यथामति तयार केला आहे. ही माझी कृतिलोकांस पसंत पडल्यास आणखी अशीच त्यांची कांहीं सेवा करण्याचा मी मोठ्या आनंदानें प्रयत्न करीन.

हें चरित्र प्रसिद्ध करण्याचे कामीं माझे मित्र रा० रा० हरि कृष्ण दामले यांनीं मला उत्तम साहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पुस्तककर्ता.

# बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र.

## भाग पहिला

उपक्रम.—बाळाजी विश्वनाथ ऊर्फ नाना यांची गृहस्थिति.—त्यांच्यावर हबशीचा राग.—भानूंची व त्यांची भेट.—महाराष्ट्रांत चाललेल्या उलाढाली.—त्यांच्यावर आलेलें संकट.—त्यांना धनाजी जाधव याच्या हाताखालीं नोकरी लागते.—मराठ्यांचे आपसांतील तंटे व त्यांचीं कारणें.—नानांनीं शाहूमहाराजांस केलेली मदत.—ते जमाबंदीची शिस्त लावतात व शेतकीस उत्तेजन देतात.–त्यांना जमाबंदी खात्याचा स्वतंत्र अधिकार मिळतो.

श्रीवर्धन हा गांव जंजिरा संस्थानांत जंजिऱ्याचे दक्षिणेस बारा मैलांवर बाणकोटच्या खाडीच्या उत्तरतीरीं आहे. हा गांव फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध असून पूर्वी तेथें फार मोठा व्यापार चालत असे. सोळाव्या शतकांत हा गांव निजामशाही घराण्याच्या अमलाखालीं होता. इ० स० १६३७ त औरंगजेबानें निजामशाहीचा शेवट केल्यावर तो विजापूरच्या अदिलशाही घराण्याच्या अमलाखालीं गेला. वरील दोन्ही घराण्यांच्या कारकीर्दीत कोंकण प्रांतांतील मुलखाचें काम हबशीकडे होतें व ते जंजिरा येथें

राहत असत. पुढें सन १६८६ त औरंगजेब बादशाहानें विजापुरचें राज्य खालसा केलें; तथापि कोंकणांतील मुलखाचा अधिकार त्यानें हबशाकडेच कायम ठेविला. त्यामुळें श्रीवर्धन येथें हबशीचाच अंमल चालत असे.

त्या गांवीं त्या वेळीं जनार्दनपंत भट या नांवाचे एक सुखवस्तु गृहस्थ राहत असत. त्यांच्याकडे श्रीवर्धनच्या देशमुखांचें[1] व कुळकर्णाचें काम असे. त्यांना दोन पुत्र होते. वडील पुत्राचें नांव विश्वनाथपंत. कनिष्ठ पुत्राचें नांव उपलब्ध नाहीं. परंतु ते राजमाचीकरांचे पूर्वज होत अशी गोष्ट ऐकिवांत आहे. जनार्दनपंतांच्यामागें विश्वनाथपंत आपला वडिलोपार्जित अधिकार चालवूं लागले. त्यांनाही दोन पुत्र होते. ज्येष्ठ पुत्राचें नांव बाळाजीपंत व कनिष्ठ पुत्राचें नांव जानोजी ऊर्फ जनार्दनपंत. वरील बाळाजीपंत हेच आमच्या प्रस्तुतच्या चरित्राचे नायक होत.

बाळाजीपंतांस बहुतकरून नाना असें म्हणत असत, व ह्या चरित्रांत आम्हीं विशेषतः त्याच नांवाचा उपयोग केला आहे. ह्या पुरुषाचें जन्म कधीं झालें, त्यांनीं बाळपणीं काय काय गोष्टी केल्या, ज्या माउलीच्या पोटीं अमला अमोल हिरा पैदा झाला तिचें नांव काय, हब-

---

१ इंग्रजी राज्य होण्यापूर्वी कोंकणांत देशमुख, देशपांडे, कुळकर्णी यांचें मोठें प्राबल्य असे, व कोणत्याही राज्यप्रकर्णी उलाढालींत हे पुढें असत. देशमुख म्हणजे महालाचा जमाबंदीचा अधिकारी. देशपांडे हा देशमुखाच्या हाताखालील अधिकारी. कुळकर्णी ह्याच्याकडे गांवच्या वसुलाचें काम असून तो पाटलाच्या हाताखालीं असतो.

शीचें व त्यांचें भांडण होण्यापूर्वी त्यांनीं काय काय कृत्यें केलीं, इत्यादि गोष्टी कोठें उपलब्ध नाहींत ही मोठी दुःखाची गोष्ट होय. आमच्या देशांतील थोर पुरुषांच्या चरित्रांची—अर्थात् देशाच्या इतिहासाची—कशी हेळसांड झालेली आहे याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. असो; तेव्हां आमच्या हातीं जेवढी माहिती लागली आहे तेवढी-वरच आम्हांस हातीं घेतलेलें काम तडीस नेणें भाग आहे.

**नानांच्या** पत्नीचें नांव **राधाबाई** असें होतें. ही **मल्हार दादाजी** डुबेरेकर बर्वे[1] यांची कन्या होय. त्यांच्या तारुण्याचा बहुतेक भाग **श्रीवर्धन** येथेंच खर्च झाला. त्यांची बुद्धि मोठी तीव्र होती व आपल्या काम-काजांत ते मोठ्या दक्षतेनें चालत असत. **नानांला** येथें दोन पुत्र झाले. वडील पुत्राचें नांव **बाजीराव** व धाकट्याचें नांव **चिमणाजी आपा**. अशा रीतीनें हें कुटुंब मोठ्या सुखानें कालक्रमणा करीत असतां त्यांच्यावर एक भयंकर प्रसंग आला, त्यामुळें **नानांला** देशत्याग करणें भाग पडलें. मनुष्याचा उदयकाल होण्यास कांहीं तरी विलक्षण गोष्टी घडाव्या लागतात, व त्या गोष्टींचें स्वरूप आरंभीं जरी भयप्रद दिसलें तरी त्याच पुढें त्याच्या उन्नत्तीस कारणीभूत होतात, याचें उत्कृष्ट उदाहरण **नानांच्या** या चरित्रावरून स्पष्ट-पणें दिसून येईल.

---

१ नाशिक जिल्ह्यांत डुबेरेकर बर्वे म्हणून प्रसिद्ध इनामदार आहेत. प्रथमतः हे कोंकणांत श्रीवर्धनाजवळ राहत असून पुढें कदाचित् त्यांस तिकडे इनामत मिळाली असेल. परंतु त्यांना पेशव्यांकडूनच इनामत मिळाली आहे किंवा काय हें आम्हांस खात्रीनें सांगतां येत नाहीं.

त्या वेळीं सुवर्णदुर्ग[1] व अंजनवेल[2] हे किल्ले व त्यांच्या सभोंवतालचा मुलूख हबशीच्या[3] ताब्यांत होता; त्यामुळें बाणकोटच्या खाडीवरही त्याचाच अंमल होता. पुढें हबशी व आंग्रे यांच्यामध्यें कांहीं कारणामुळें तंटा उपस्थित झाला तेव्हां आंग्रे हा हबशीचे लोक फितूर करूं लागला. त्या वेळीं नाना व जानोजी हे आंतून आंग्र्यास सामील आहेत असें एका मनुष्यानें द्वेषबुद्धीनें हबशीस सांगितलें. हबशी हलक्या कानाचा असल्यामुळें त्यानें त्या गोष्टीची बारीक रीतीनें चौकशी वगैरे कांहींएक न करतां जानोजीस एकदम कैद केलें, व त्याला जंजिऱ्यास घेऊन गेल्यावर त्याच्या अपराधाची विशेष चौकशी न करतां त्याला पोत्यांत घालून समुद्रांत बुडवून ठार मारलें! हबशीनें जानोजीचा असा भयंकर रीतीनें शेवट केलेला पाहून नाना फार घाबरून गेले, व यापुढें आपण येथें राहिलों तर आपल्या सर्व कुटुंबाची तो दुष्ट अशाच रीतीनें वाट लावील अशी त्यांना मोठी भीति पडली. शेवटीं कुजनसेवेपेक्षां देशत्याग बरा असें त्यांस वाटून, श्रीवर्धन सोडून घांटावर कोठें तरी नोकरी धरून आपला चरितार्थ चालविण्याचा त्यांनीं निश्चय केला.

---

१ हा पाण्यांतील किल्ला असून रत्नागिरी जिल्ह्यांत अंजनवेलच्या उत्तरेस १५ मैलांवर बाणकोटचे खाडीचे मुखाशीं आहे.

२ ह्याला गोपाळगड असें दुसरें नांव आहे. हाही रत्नागिरी जिल्ह्यांतच सुवर्णदुर्गचे दक्षिणेस १५ मैलांवर दाभोळच्या खाडीच्या मुखाशीं दक्षिणतीरावर आहे.

३ ह्या वेळीं शिद्दी काशीम ह्याच्याकडे जंजिरा संस्थानचें स्वामित्व होतें.

बाणकोटच्या खाडीच्या दक्षिणतीरीं वेळास ह्मणून एक गांव आहे तेथें त्यावेळीं भानू या उपनांवाचें एक कुलीन घराणें राहत असे, व त्या घराण्यांत हरी महादेव, बाळाजी महादेव व रामजी महादेव असे त्रिवर्ग बंधु होते. त्यांचा व नानांचा बालपणापासून अत्यंत स्नेह असे. तेव्हां वेळासेस जाऊन आपला सर्व बेत नानांनीं ह्या त्रिवर्ग बंधूंस कळविला. तेव्हां "आह्मींही तुह्मांबरोबर येतों. तुमच्या आश्रयानें आह्मांस कोठें तरी रोजगार मिळतील, आह्मांस बरोबर घेऊन चला" असें त्या त्रिवर्ग बंधूंचें ह्मणणें पडलें. तेव्हां नानांनीं "बरें आहे, आह्मांस भाकर मिळेल तींत तुह्मांसही चोतकर मिळेल" असें त्यांस वचन दिलें.

ह्या वेळीं महाराष्ट्रांत मोठमोठ्या उलाढाली चालल्या होत्या. सर्व मराठी राज्याचा कारभार ताराबाई पहात होती. रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्रिंबक प्रतिनिधि, धनाजी जाधव, शंकराजी नारायण सचिव वगैरे सरदार मंडळी त्या वेळीं मराठी राज्यांत प्रमुख होती व त्यांच्या कीर्तीनें सारा देश दणाणून गेला होता; मोंगलांच्या सत्तेचा ऱ्हास होत चालला होता व मराठ्यांची सत्ता जोरानें विस्तृत होत चालली होती; व ज्याच्या अंगांत पराक्रम होता त्याला मर्दुमकीचीं कामें करून योग्यतेस चढावयास तो काल मोठा योग्य होता. नानांच्या अंगींही तशाच प्रकारचा पराक्रम असल्यामुळें नशिबाची पारख करण्याचा त्यांनीं निश्चय केला; व त्रिवर्ग भानू व आपलें सर्व कुटुंब बरोबर घेऊन घांटावर जाण्याचे हेतूनें ते अंजनवेलच्या खाडीवर आले, व तेथून चिपळुणास जाऊन

तिवऱ्याच्या¹ घांटानें देशावर येण्याकरतां निघाले. आज आपण हबशीच्या तडाक्यांतून सुटलों असें त्या वेळीं नानांस वाटलें. परंतु तेवढ्यानें त्यांचे हाल पुरे झाले नव्हते.

नाना चिपळुणास आले नाहींत तोंच ते श्रीवर्धन सोडून पळून गेल्याची बातमी हबशीस समजली. ह्या गोष्टीचा हबशीस मोठा राग येऊन किल्लेदारानें त्यांना पकडून आणण्याचा अंजनवेलच्या किल्लेदारास तावडतोब हुकूम लिहिला. हुकम हातीं पडतांच त्यानें नानांचा पाठलाग करून त्यांना तिवरा घांटाच्या पायथ्याशीं कैद केलें व अंजनवेलीस परत घेऊन आला. आपण आतां मात्र खास प्राणास मुकणार असें नानांस वाटलें; परंतु हबशीनें तशा प्रकारचा कांहींएक हुकूम न करतां अंजनवेलच्या किल्ल्यांत त्यांस कैदेंत ठेवण्याविषयीं त्या किल्लेदारास हुकूम दिला. त्या ठिकाणीं ते पंचवीस दिवस कैदेंत होते. तितक्या काळांत त्रिवर्ग भानूंनीं मोठी खटपट करून व किल्लेदारास लांच देऊन नानांची मुक्तता केली. भानू त्या वेळीं नानांच्या उपयोगीं न पडते तर ते खचितच प्राणास मुकले असते. भानूंचे हे उपकार नाना व त्यांचे वंशज कधींहीं विसरले नाहींत. भानूंचें घराणें पुढें जें एवढ्या नांवलौकिकास चढलें त्याचें मुख्य कारण हे उपकारच होत. बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडनवीस यांची हीच पूर्वपीठिका होय. असो; नंतर त्रिवर्ग बंधूंसह नाना सासवडास

---

१ ह्याचे उत्तर तिवरा व दक्षिण तिवरा असे दोन भाग आहेत. उत्तर तिवरा घांट चिपळूण व सातारा यांचेमध्यें आहे. दक्षिण तिवरा घाट संगमेश्वर व मिरज यांच्यामध्यें आहे.

अंबाजी[1] त्रिंबक पुरंदरे यांचे येथें येऊन पोहोंचले.[2] नानांनीं अंबाजीपंतांस आपला बेत कळविला तेव्हां त्यांना तो पसंत पडून अंबाजीपंत, नाना व त्रिवर्ग भानू साताऱ्यास येऊन पोहोंचले. कांहीं दिवस अंबाजीपंत व नाना हे मक्त्त्याच्या मामलती करून मोंगलाईंतील हजार पांचशें स्वार बाळगून होते. पुढें त्या कामांत त्यांची हुशारी पाहून परशुराम त्रिंबक प्रतिनिधी याच्या शिफारशीवरून धनाजी जाधव यानें त्या दोघांस आपल्या हाताखालीं जमाबंदीच्या

---

१ हे पुरंदरे घराण्याचे मूळपुरुष होत. हे सासवडचे देशपांडे. ग्रांट डफ वगैरेंच्या इतिहासांत यांचें नांव आबाजीपंत असें दिलें आहे, परंतु तें चुकीचें असावें; कारण अस्सल बखरींत व पुरंदरे यांच्या छापील वंशावळींत अंबाजीपंत असें नांव दिलें आहे. सासवड हें तालुक्याचें ठाणें असून पुण्याचे आग्नेयीस १६ मैलांवर आहे.

२ नाना कोंकणांतून देशावर आले या संबंधाचे निरनिराळे लेख आहेत. एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्यांच्यावर जंजिऱ्याच्या हबशीचा कांहीं कारणावरून मोठा राग झाल्यामुळें ते आपल्या कुटुंबासह चिपळुणास आले व तेथें जकातीचा वगैरे रोजगार करून त्यांनीं कांहीं दिवस काढले. पुढें मोठा रोजगार मिळवावा अशी उमेद धरून श्रीमंत पंतसचिव शंकराजी नारायण यांच्याकडे आले. नंतर त्यांच्याबरोबर साताऱ्यास आल्यावर त्यांनीं धनाजी जाधव याच्या पदरीं नोकरी धरिली. दुसरी अशी एक गोष्ट ऐकिवांत आहे कीं, मराठ्यांचा सरदार सिधोजी गुजर हा गलबतांतून प्रवास करीत असतां तें गलबत फुटलें व तो मोठ्या शर्तीनें श्रीवर्धन येथें लागला. त्याचा त्या ठिकाणीं नानांनीं फार उत्तम रीतीनें पाहुणचार केल्यामुळें तो कृतज्ञताबुद्धीनें नानांस बरोबर घेऊन देशावर आला. परंतु ह्या दोन्हीपेक्षां वर दिलेली हकीकत आह्मांस बरी वाटल्यामुळें तीच आह्मीं ग्राह्य धरली आहे.

कामावर कारकून नेमिलें. प्रथम नानांस सालीना १०० रुपयांची असामी लागली. त्रिवर्ग भानूंपैकीं रामाजीपंत हे शंकराजी नारायण सचिव यांचेकडे नोकरीस राहिले; व हरी महादेव व बाळाजी महादेव हे कांहीं दिवस नानांचे जवळच रिकामे होते.

नानांस धनाजीच्या हाताखालीं कारकुनीची नोकरी मिळाली त्या सुमारास मराठ्यांचे आपसांतील तंटे मोठ्या ज्यारीनें सुरू झाले. तो प्रकार असाः—

इ० स० १७०७ त औरंगजेब बादशाहा अहमदनगर येथें मृत्यु पावला. त्याला तीन पुत्र होते. वडील मोअजीम हा त्या वेळीं काबुलांत एका मोठ्या कामगिरीवर होता, मधला अजीमशाहा हा बादशाहाजवळ होता, व धाकटा कामबक्ष हा विजापुरच्या सुभेदारीवर होता. बादशाहा मृत्यु पावतांच अजीमशाहा आपणास दिल्लीचा बादशाहा असें म्हणवूं लागला, व त्यानें कामबक्ष यास दक्षिणचें सहा सुभ्यांचें राज्य देऊं करून आपल्याकडे सामील करून घेतलें. नंतर आपली फौज बरोबर घेऊन तो दिल्लीस जाण्याकरतां नर्मदा उतरून पलीकडे गेला. तिकडे मोअजीम यास ही बातमी कळतांच त्यानें आपणास बाहादुरशाहा असा किताब घेतला व आपला गादीवरील हक्क स्थापित करण्याकरतां आपल्या फौजेसह तो काबुलाहून दिल्लीस येण्याकरतां निघाला. मोंगलांच्या सैन्याचा तळ दक्षिणेंतून हालतांच मराठे त्यांच्या मुलखांत धामधूम करूं लागले, व त्यांनीं चाकण[1] वगैरे किल्ले घेतले. मराठ्यांचें तें भयप्रदरूप पाहून त्यांचा कसा बंदोबस्त करावा

[1] हा किल्ला पुण्याचे उत्तरेस १८ मैलांवर आहे.

या गोष्टीचा अजीमशाहास विचार करणें जरूर पडलें. तेव्हां त्याच्याबरोबर त्या वेळीं झुलपिकारखान नांवाचा एक सरदार होता त्याला त्यानें याची मसलत विचारली. अजीमशाहाबरोबर त्या वेळीं शाहूमहाराज व त्यांचें कुटुंब होतें[१]. झुलपिकारखानाचें शाहूमहाराजांवर पुत्रवत् प्रेम होतें. तेव्हां त्यांची मोंगलाचे कैदेंतून मुक्तता करण्याला ही संधि बरी आहे असें त्यास वाटून त्यानें अजीमशाहास अशी मसलत सांगितली कीं, " आपणास मराठ्यांची धामधूम बंद करणें असेल तर त्याला एकच मार्ग आहे; तो असा कीं, त्यांचे आपसांत तंटे लावून द्यावे, व ते तंटे लावायाला, आपल्या कैदेंत संभाजीचा बेटा शाहू आहे त्याची मुक्तता केली पाहिजे. मराठ्यांचे आपसांत कलह माजले म्हणजे त्यांना आपल्या मुलुखास त्रास देतां येणार नाहीं. " अजीमशाहास ती मसलत पसंत पडून त्यानें शाहूमहाराजांस, " तुम्ही दक्षिणेंत दिल्लीचे बादशाहाचे अंकित म्हणून राज्य करावें " असें सांगून त्यांची कैदेंतून मुक्तता केली. ह्या वेळीं अजीमशाहानें शाहूमहाराज व दुसरीं कांहीं मंडळी यांसच फक्त मोकळें केलें. महाराजांची मातुश्री येसूबाई व सावत्र भाऊ मदनसिंग वगैरे मंडळी आपणाजवळ ठेवून घेतली होती.

अशा रीतीनें सन १७०७ त राज्यपदारूढ होण्याचे

---

१ झुलपिकारखानानें सन १६९० त रायगडचा किल्ला घेतला व संभाजीचा पुत्र शाहू व पत्नी येसूबाई व दुसरी कांहीं मंडळी यांस घेऊन तो औरंगजेबाकडे गेला. तें सर्व कुटुंब औरंगजेब मरेपर्यंत मोंगलांच्या कैदेंत होतें. औरंगजेबाच्या मागें अजीमशाहानें त्यांना दिल्लीस नेण्याचे हेतूनें बरोबर घेतलें होतें.

हेतूनें शाहूमहाराज दक्षिणेंत येण्याकरतां निघाले; व अजीमशाहा बाहादुरशाहाशीं सामना देण्याकरतां उत्तरेकडे निघून गेला. त्या दोघां भावांची आग्र्याचे दक्षिणेस धोलपूर येथें फार मोठी लढाई झाली. तींत अजीमशाहाचा पराजय होऊन तो लढाईंत मरण पावला व बाहादुरशाहास जय मिळून तो दिल्लीच्या तक्तावर बसला.

शाहूमहाराज दक्षिणेंत येण्याकरतां निघाले ते बऱ्हाणपुरास येऊन पोहोंचल्यावर त्या ठिकाणीं परसोजी भोंसले, चिमणाजी दामोदर इत्यादि मराठे सरदार त्यांना येऊन मिळाले, व त्यांच्याजवळ बरीच फौज जमा झाली. नंतर गोदावरी उतरून महाराज अलीकडे आले व तेथून त्यांनीं आपण आल्याचें पत्र ताराबाईस पाठविलें. तिला तें वर्तमान कळलें त्या वेळीं फार वाईट वाटलें. ताराबाई मोठी महत्त्वाकांक्षी बायको होती. मराठी राज्याचा कारभार नेहमीं आपण चालवावा असें तिला वाटत होतें. आपण शाहूमहाराजांस राज्य दिलें तर आपणास व आपल्या मुलास त्यांचे अंकित राहवें लागेल ही गोष्ट तिला आवडली नाहीं. तेव्हां तिनें, हल्लीं राज्यावर हक्क सांगण्याकरतां शाहू या नांवानें जो मनुष्य येत आहे तो खरा शाहू नसून कोणी तोतया आहे अशी लोकांत कंडी पिकविली; व धनाजी जाधव व परशुराम त्रिंबक यांच्याबरोबर मोठी फौज देऊन त्यांना शाहूमहाराजांचें पारिपत्य करण्याकरतां पाठवून दिलें. धनाजीबरोबर ह्या वेळीं नाना व नारोराम[१]

---

१ क्यांबेल साहेबांनीं हें सर्व कारस्थान मंत्री घराण्याचा मूळ पुरुष नारोराम रंगराव याचे मध्यस्थीनें झालें असें लिहिलें आहे.

( पुढें चालू. )

रंगराव शेणवी हे होते. परशुराम त्रिंबक यांनीं आपला तळ चाकण येथें दिला व शाहूमहाराजांच्या सैन्याचा तळ खेडकडून[1] येथें पडला होता. प्रथमतः एक लहानशी लढाई झाली तींत शाहूमहाराजांचा जय झाला. पुढें शाहूमहाराजांच्या खरेखोटेपणाविषयीं धनाजीनें परशुराम भोसले यास पाठवून बातमी आणविली तेव्हां हेच शाहूमहाराज अशी सर्वांची खातरी झाली. नंतर रात्रीस धनाजी व कांहीं सरदार मंडळी एकत्र जमली तेव्हां आपल्या खऱ्या धन्याच्या विरुद्ध आपण तरवार उचलतों ही गोष्ट त्यांना अनुचित वाटून त्यांनीं नानांस महाराजांशीं सलोखा करण्याचे हेतूनें आपले वतीनें पाठवून दिलें. त्यांनीं महाराजांची भेट घेऊन सांगितलें कीं, "जाधवराव सेनापति व दुसरी सरदार मंडळी यांचें असें ह्मणणें आहे कीं, आह्मी महाराजांचे चाकर, पाय पहावे अशी निष्ठा आहे. हुकूम व्हावा. प्रातःकाळीं २५००० फौजेनिशीं येतों." हा निरोप ऐकून महाराज फार खूश झाले व त्यांनीं लगेच नानांस सांगितलें कीं, "ही चाकरी केलियास मागाल तें बक्षीस आहे. निखालस मागा." त्या वेळीं नानांनीं "आठ पदांतून उत्तम पद मिळावें एवढी इच्छा आहे" असें सांगितलें. नंतर महाराजांनीं आश्वासन दिल्यावर नाना गोटांत परत आले. दुसरे दिवशीं धनाजी

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

कदाचित् त्या वेळीं नानांबरोबर नारोराम गेला असल्यास तसेंही ह्मणतां येईल. परंतु ह्या गोष्टीस मराठी बखरींतून फारसा आधार मिळत नाहीं.

१ हा गांव पुण्याचे उत्तरेस १२ मैलांवर आहे.

आपल्या फौजेसह महाराजांस येऊन मिळाला, व परशुराम त्रिंबक याचा पुरा नाश होऊन तो सातान्यास पळून आला. नंतर सन १७०८त सातारचा किल्ला घेऊन महाराजांनीं आपणास राज्याभिषेक करून घेतला.

वर सांगितलेल्या आपसांतील कलहांमुळें त्या वेळीं जमिनीची लागवड वगैरे बरोबर होत नसे; व त्यामुळें वसूलबाबीचें उत्पन्न पुष्कळ कमी झालें होतें. शाहूमहाराज गादीवर बसल्यानंतर थोडक्याच दिवसांत नानांनीं शेतकीस उत्तेजन देऊन जमाबंदीची शिस्त फार उत्तम रीतीनें लावून दिली. त्यामुळें धनाजीची नानांवर फार मर्जी बसली व त्यानें आपण फक्त नांवाला अधिकारी राहून जमाबंदीचा सर्व अधिकार नानांच्या गळ्यांत घातला. त्याचप्रमाणें विशेष महत्त्वाची गोष्ट करणें झाल्यास धनाजी नानांची सल्लामसलत नेहमीं घेत असे. तो नानांच्या लोकोत्तर बुद्धीबद्दल वारंवार शाहूमहाराजांपाशीं तारीफ करीत असे, यामुळें महाराजांचीही नानांवर मर्जी बसत चालली. ह्या वेळेपासून नानांच्या उदयकालास प्रारंभ झाला.

इ० स० १७०९ त शाहूमहाराजांनीं चंदनवंदन[१] येथें मोठी फौज गोळा करून ताराबाईवर स्वारी केली. ह्या स्वारींत धनाजी जाधव त्यांच्याबरोबर होता व त्यानें नानांस आपणाबरोबर घेतलें होतें. नानांनीं पुढें स्वतः होऊन ज्या मोहिमा केल्या, त्या कशा चालवाव्या याचें शिक्षण ह्या स्वारीपासून त्यांना चांगलें मिळालें.

धनाजी फार वृद्ध झाला होता यामुळें त्याच्या अं-

१ हे एका लगत एक असे दोन किल्ले सातारचे ईशान्येस १० मैलांवर आहेत.

गांत काम करण्याची पूर्वीप्रमाणें ताकद उरली नव्हती. पुढें महाराजांच्या स्वारीचा तळ कोल्हापूर येथें पडला असतां धनाजीच्या पायाला पूर्वी एक मोठी जखम लागली होती ती फुटली, व पुढें तें दुखणें विकोपास गेलें. आपण आतां ह्या दुखण्यांतून पार पडत नाहीं असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें, तेव्हां तो नानांस बरोबर घेऊन सातार्‍यास येण्याकरतां निघाला. परंतु वाटेंतच वारणेचे[1] कांठीं वडगांव येथें इ० स० १७१०त त्याला देवाज्ञा झाली. धनाजीस एक पुत्र होता. त्याचें नांव चंद्रसेन असें होतें. धनाजी आपलें सर्व काम नानांकडून करवीत असे ह्या गोष्टीचें त्याला मोठें वैषम्य वाटत असे, त्यामुळें तो नानांचा फार हेवा करीत असे. धनाजीचे पश्चात् शाहूमहाराजांनीं सेनापतिपद चंद्रसेनास दिलें, परंतु जमाबंदीचा अधिकार त्यास न देतां तें काम स्वतंत्र रीतीनें नानांकडे कायम केलें. हे दोन्ही अधिकार आपणाकडेच असावे असें चंद्रसेनास वाटत होतें, परंतु शाहूमहाराजांनीं अशा तर्‍हेची व्यवस्था केलेली पाहून त्याला नानांचा मोठा राग आला व त्याचा पूर्वीचा द्वेष दुणावला. त्यानें त्या संबंधानें, संधि सांपडली म्हणजे नानांचा सूड घेण्याचा निश्चय केला. पुढें त्याला तशा प्रकारचा प्रसंग कसा आला याची हकीकत पुढील भागांत दिली आहे.

---

१ ही नदी सातारा जिल्हा व कोल्हापूर यांच्यामध्यें असून सांगलीचे दक्षिणेस ३ मैलांवर कृष्णेस मिळते.

# भाग दुसरा.

निजामउल्मुल्क दक्षिणच्या सुभेदारीवर येतो.—दक्षिणेंतील शाहूमहाराजांचे चौथाई वगैरे हक्क सुरळीत वसूल होत नाहींत म्हणून ते वसूल करण्याकरितां चंद्रसेन जाधव यास पाठवितात.—नाना व चंद्रसेन जाधव यांचा बेबनाव व त्या तंट्याचा शेवट.

इ० स० १७१२त सुलतान मोअजीम ह्मणजे बाहादुरशाहा मरण पावला. तेव्हां त्याच्या मुलांत गादीविषयीं तंटे उपस्थित झाले. पुढें झुलपिकारखानाच्या मदतीनें त्याचा ज्येष्ठ पुत्र जहांदरशाहा हा गादीवर बसला. तो गादीवर आल्यावर त्यानें, त्याचे जे भाऊबंद गादीवर हक्क सांगत होते व सांगण्यासारखे होते, त्यांना ठार मारून टाकलें. परंतु त्याचा दुसरा भाऊ अझिमुश्शान याचा पुत्र फिरुकशियर हा त्या वेळीं त्याच्या तावडींत सांपडला नाहीं. तो हुसेनअल्ली व अबदुल्लाखान या दोन सय्यद बंधूंच्या मदतीनें दिल्लीवर चाल करून आला. त्याची व बादशाहाची लढाई होऊन बादशाहाचा पराजय झाला व तो पळून गेला. तेव्हां झुलपिकारखानानें आपल्या बापाच्या मसलतीवरून आपणावरील फिरुकशियरचा राग कमी करण्याकरतां दगलबाजीनें बादशाहास त्याच्या स्वाधीन केलें. फिरुकशियरनें लगेच त्यास ठार मारून टाकिलें व झुलपिकारखानाच्या गळ्यास फांस घालून त्याचाही जिव घेतला. अशा रीतीनें इ० स० १७१३ त फिरुकशियर हा सय्यदांच्या मदतीनें गादीवर बसला. त्यानें अबदुल्लाखान यास आपली वजिरी दिली व हुसेनअल्लीस आपला सेनापति नेमिलें. तसेंच जहांदरशाहाच्या वेळीं आपला हस्तक म्हणून झुलपिकारखानानें दाऊदखान पन्नी

यास दक्षिणचा सुभेदार नेमिलें होतें त्याला काढून निजामउल्मुल्क किंवा चिंकिलीजखान याची त्या महत्त्वाच्या जागेवर नेमणूक केली.

दाऊदखान दक्षिणचा सुभेदार होता तोंपर्यंत शाहूमहाराजांचा पक्ष त्याच्या मदतीमुळें जोरांत होता, व त्यांचे चौथाईचे वगैरे हक्क सुरळीतपणें वसूल होत होते. परंतु निजामउल्मुल्काची दक्षिणच्या सुभेदारीवर नेमणूक झाल्यामुळें पूर्वीचें सर्व मान फिरलें. त्यानें कोल्हापुरच्या संभाजीचा[1] पक्ष धरला, त्यामुळें दक्षिणच्या चौथाईचा वगैरे वसूल नियमितपणें शाहूमहाराजांस येण्याचें बंद पडलें. तेव्हां मोंगलांपासून ते हक्क वसूल करण्याकरतां शाहूमहाराजांनीं चंद्रसेन जाधव याच्याबरोबर फौज देऊन त्याला पाठवून दिलें, व वाटेनें जो वसूल येईल त्याची नीट व्यवस्था लावण्याकरतां नानांस त्याच्याबरोबर पाठविलें. ह्या गोष्टीमुळें चंद्रसेनाच्या मनांत नानांचे संबंधानें धुमसत असणारा वैमनस्याग्नि ज्यास्तच भडकला; व कांहीं तरी कुरापत काढून नानांचा नाश करावा असें त्यास वाटूं लागलें. पुढें कर्मधर्मसंयोगानें त्याला तशा प्रकारची एक उत्कृष्ट संधीही आली. तो प्रकार येणेंप्रमाणें:—

---

१ शाहूमहाराज सातारा येथें गादीवर बसल्यानंतर कांहीं दिवसांनीं ताराबाईनें आपली गादी कोल्हापूर येथें स्थापिली. पुढें इ० स० १७१२ त तिचा पुत्र शिवाजी मरण पावला. तेव्हां रामचंद्रपंत अमात्य यानें ताराबाई व तिची सून भवानीबाई यांस कैद केलें, व राजारामाची धाकटी बायको राजसबाई हिचा पुत्र संभाजी यास गादीवर बसवून आपण राज्यकारभार चालवूं लागला.

एके दिवशीं नानांच्या पथकांतील पिराजी राऊत या नांवाचा एक शिलेदार हरणाची पारध करीत त्याच्यामागें लागला. तो हरण पळतां पळतां व्यासराव ह्मणून कोणीएक ब्राह्मण चंद्रसेनाच्या पथकांत होता त्याच्या राहुटींत शिरला. त्याला मारण्याकरतां पिराजीही त्याच्यामागून राहुटींत शिरूं लागला. परंतु व्यासरावानें त्याला अडथळा केला. पिराजीनें हरणास मारण्याकरतां बाहेरूनच भाला फेंकला; परंतु तो, व्यासराव मध्यें आडवा आल्यामुळें त्याला लागला व त्यामुळें त्यास मोठी जखम झाली. तें पाहून पिराजी फार घाब-रला व आपल्या राहुटींत पळून गेला. नंतर त्यानें झालेली कच्ची हकीकत नानांचे कानावर घातली, व कदाचित् व्या-सरावानें चंद्रसेनाकडे त्या गोष्टीची फिर्याद केल्यास आपलें त्याच्यापासून रक्षण करावें ह्मणून त्यानें त्यांची प्रार्थना केली. नाना मनाचे फार कनवाळू होते. वास्तविक पहातां ह्या कामांत पिराजीचा अपराध होता, तथापि शरणागताचें रक्षण करणें हें थोरांस भूषण आहे हें लक्षांत आणून नानांनीं पिराजीस अभय दिलें. पुढें व्यासरावानें चंद्रसेनाकडे या-बद्दल फिर्याद केली. तेव्हां त्यानें पिराजीस शिक्षा कर-ण्याच्या हेतूनें नानांस निरोप पाठविला कीं, “तुमचे कडील स्वार पिराजी राऊत यानें आमचे पथकांतील ब्राह्मण व्यासराव यास वार केला आहे. त्याच्या हातून हा मोठा अपराध झाला आहे, तर त्याला ताबड-तोब आमचेकडे पाठवून द्यावें.” तेव्हां नानांनीं चंद्रसेनास परत निरोप पाठविला कीं, “पिराजीनें मुद्दाम होऊन व्या-सरावावर भाला टाकला नाहीं. हरणास मारण्याच्या हेतूनें

त्यानें भाला फेंकला, परंतु व्यासराव मध्यें आलेयामुळें त्याला तो चुकून लागला; तथापि हा पिराजीचा अपराध आहे. परंतु तोही आपलेच पदरचा आहे. तो आह्मांस शरण आला आहे व आह्मीं त्यास अभय दिलें आहे. तेव्हां आपण त्यास क्षमा केली पाहिजे. शिक्षा करणेंच असेल तर ती काय करावी तें लिहावें ह्मणजे त्याप्रमाणें करतां येईल. " नानांचा हा निरोप चंद्रसेनास पटला नाहीं. त्यानें नानांस उलट निरोप पाठविला कीं, " त्याचें पारिपत्य झालेंच पाहिजे; करितां त्याला लवकर पाठवून द्यावें. " आपल्या निरोपाचा चंद्रसेनानें कांहींच विचार केला नाहीं हें पाहून नानांस मोठा राग आला व चंद्रसेनास त्यांनीं कांहींच उत्तर पाठविलें नाहीं; व पिराजीसही पाठविलें नाहीं. ज्याला आपण एकदा पाठीशीं घातलें त्याचें रक्षण करण्यांत आपले प्राण खर्चीं पडले तरी हरकत नाहीं असा मनाचा निश्चय करून नाना स्वस्थ बसले. ह्या गोष्टीमुळें नानांनीं आपला अपमान केला असें चंद्रसेनास वाटून त्याला मोठा राग आला. शिवाय नानांच्या संबंधानें त्याच्या मनांत पूर्वींपासून द्वेष बाणलाच होता तेव्हां त्याचा वचपा काढण्यास ही वेळ बरी आहे असेंही त्याला वाटलें. तेव्हां त्यानें आपले स्वार नानांच्या पथकावर पाठवून दिले. नानांच्या पथकांत फार थोडे लोक होते तेव्हां ते मोठ्या संकटांत पडले. शेवटीं त्यांनीं आपल्या लोकांस लहान लहान टोळ्या करून निघून जाण्यास सांगितलें, व आपणही शेंसवाशें निवडक लोक बरोबर घेऊन निघून गेले. ह्या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांचे चिरंजीव बाजी व आपा हे असून त्यांचे मित्र अंबाजीपंत पुरंदरे हेही होते.

[library stamp]

चंद्रसेनास ती गोष्ट समजली तेव्हां त्यानें आपले तीन हजार लोक नानांचा पाठलाग करण्याकरतां पाठवून दिले. नाना प्रथमत: पुरंदर किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिले व तेथून त्यांनीं सचिवाजवळ[1] आश्रय मागितला. नाना हातीं लागले नाहींत ह्मणून चंद्रसेनाची फौज परत गेली. तेव्हां तो स्वत: आपलें सर्व लष्कर बरोबर घेऊन ज्या महत्त्वाच्या कामगिरीवर त्याला शाहू महाराजांनीं पाठविलें होतें तिचा कांहींएक विचार न करतां नानांचा पाठलाग करण्याकरतां परत फिरला व बारामतीवरून सुप्यास आला. तेथें त्यास, नाना पुरंदरास आहेत अशी बातमी लागली. तेव्हां त्यानें सचिवास निरोप पाठविला कीं, " बाळाजीपंतास तुम्हीं आश्रय देऊं नये, दिल्यास आम्हांस तिकडे येणें प्राप्त आहे. तुमचे मुलखाची खराबी झाल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. " चंद्रसेनाचा हा निरोप जातांच सचिव फार घाबरून गेला व " तुमचा येथें निभाव लागणार नाहीं " म्हणून त्यानें नानांस निरोप पाठविला. चंद्रसेन अगदीं पिछाडीस येऊन भिडला तथापि नाना डगमगले नाहींत. पुढें त्यांच्याजवळ पिलाजी जाधव व नाथाजी धुमाळ या नांवांचे दोन शिलेदार होते त्यांनीं पांच सहाशें लोक जमा केले व त्यांच्यासह नाना पेरिंच्यावरून निरेवर आले. चंद्रसेनाचे लोक त्यांच्यामागें लागलेच होते. शेवटीं त्यांनीं निरेवर फारच लगट केली.

---

१ ह्या वेळीं शंकरजी नारायण याचा पुत्र नारो शंकर हा सचिव होता. परंतु तो अज्ञान असल्यामुळें त्याचा सर्व कारभार राझेकर या नांवाचा एक मनुष्य पाहत असे.

२ हा गांव पुणें जिल्ह्यांत पुरंदर तालुक्यांत आहे.

तेव्हां उभयपक्षांची त्या ठिकाणीं लहानशी चकमक झडली. परंतु चंद्रसेनाचे लोक फार असल्यामुळें नानांस जय मिळाला नाहीं. तथापि नाना चंद्रसेनाच्या हातीं सांपडले नाहींत. शेवटीं पिलाजी व नाथाजी या दोघांनीं मोठ्या कष्टानें नानांस त्यांच्या मुलांमाणसांसह पांड[1]वगडाजवळ माची म्हणून एक खेडें आहे तेथें सुरक्षित नेऊन पोहोंचविलें; व ते पांडवगडचे आश्रयास जाऊन राहिले.

नाना ह्या ठिकाणीं येऊन पोहोंचले नाहींत तोंच चंद्रसेनानें किल्ल्यास वेढा घातला. आतां शाहूमहाराजांशिवाय या संकटांतून आपणास मुक्त करण्यास दुसरें कोणी समर्थ नाहीं असें पाहून नानांनीं अंबाजीपंत पुरंदरे यास गुप्त रीतीनें साताऱ्यास पाठवून दिलें. अंबाजीपंत व खंडो बल्लाळ चिटणीस यांचा पूर्वीपासून फार स्नेह असल्यामुळें प्रथमतः तो त्यांनाच भेटला व त्यानें कच्ची हकीकत त्यांच्या कानांवर घातली. पुढें ते दोघे मिळून महाराजांकडे गेले. चिटणिसांनीं महाराजांस सांगितलें कीं, “बाळाजी शहाणे, कर्ते, मोठे माणूस, त्यांच्यावर सेनापतीनें असा प्रसंग आणला म्हणून स्वामींस शरण आले आहेत. सेनापतीपासून रक्षण करण्याचें अभय देऊन रक्षिलें पाहिजे. संरक्षण होण्यास अन्य त्राता कोणींही नाहीं. बाळाजीपंत मनसब्याविशीं बहुत चतुर व शिपाई धाडसाचे आहेत.” नानांच्या कर्तबगारीबद्दल धनाजीच्या वेळेपासून महाराजांची खात्री झालीच होती. तेव्हां अशा थोर पुरुषाचें रक्षण केलेंच पाहिजे असें मनांत येऊन त्यांनीं नानांस अभयपत्र पाठवून दिलें व हुजूर निघून येण्यास आज्ञा केली.

---

१ हा किल्ला वांईच्या वायव्येस ४ मैलांवर आहे.

महाराजांनीं नानांस आश्रय दिला ही गोष्ट चंद्रसे-नास समजली तेव्हां त्याला फारच राग आला. त्यानें शाहूमहाराजांस पत्र पाठविलें कीं, "बाळाजीपंत यांस स्वामींनीं आश्रय दिला असतां आह्मांस महाराजांचे पाय सुटतील. आम्हांस त्यांचें पारिपत्य केल्यावांचून रहावयाचें नाहीं." महाराजांचें मन फार थोर होतें. प्रथमतः त्यांनीं चंद्रसेनाचा हा उद्दामपणाचा लेख मनावर घेतला नाहीं. परंतु आपसांत तंटे लागून दुही माजावी ह्या गोष्टीचें मात्र त्यांना फार वाईट वाटलें. महाराजांनीं लगेच चंद्रसेनाची समजूत घालण्याकरतां खंडो बल्लाळ चिटणीस यांस त्याच्या-कडे पाठविलें. त्यांनीं चंद्रसेनास पुष्कळ प्रकारें समजून सांगितलें, परंतु तो आपला हेका सोडीना. पुढें चिटणीस परत आले व त्यांनीं सविस्तर वृत्त महाराजांस निवेदन केलें. त्या वेळीं चंद्रसेनाचा त्यांना मोठा राग आला. त्यांनीं, सरलष्कर हैबतराव निंबाळकर त्या वेळीं अहमदनगराकडे होता त्याला निरोप पाठविला कीं, "सेनापतींस सरका-रांशीं विरुद्ध वागण्याची बुद्धि निर्माण झाली आहे, तरी तुम्हीं आपला जमाव असेल तो घेऊन व नवाही जमा क-रीत करीत सेनापतींस मोकाबला देऊन जलद उतरावें (त्यांची चांगली रग जिरवावी.) इकडून हुजुरातची फौज तुम्हांपाशीं येऊन पावेल." तेव्हां हैबतराव आपल्या फौजेसह तावडतोब नगराहून निघाला, व प्रथमच्या मुक्कामास तो सुमारें ४० कोसांवर फलटण येथें येऊन दाखल झाला. चंद्र-सेन ह्या वेळीं पांडवगडास वेढा घालून आंत नानांस कोंडून धरून बसला होता. त्याला सरलष्कर फौजेसह आपल्या पारिपत्याकरतां फलटणपर्यंत आला ही बातमी कळतांच

अ..नगर ...

त्यानें पांडवगडचा वेढा उठविला व त्याच्या ईशान्येस १९मैलांवर दहिंगांव जेऊर येथें निघून गेला. महाराजांनीं त्या ठिकाणीं चंद्रसेनास पुनः पत्र पाठविलें कीं, "तुह्मीं सरकारची अशी अवज्ञा करावी हें तुह्मांस योग्य नाहीं, शिवाय सरकारी फौजेंत फितूर करून सरकारची फौज सरकारचे विरुद्ध लढाईला उभी करावी हा तुमचा सेवाधर्म नव्हे. याकरतां आग्रह टाकून देऊन सलोखा करावा हें फार चांगलें." महाराजांनीं इतकें सांगितलें तरी तो ताळ्यावर आला नाहीं. खरोखर,

युक्तचि मरणाला हितपरिणामहि न सोसवे काढा ॥

या मोरोपंताच्या उक्तीचें या ठिकाणीं कोणास स्मरण होणार नाहीं ?

चंद्रसेन सामोपायानें ताळ्यावर येत नाहीं असें पाहून शाहूमहाराजांनीं हैबतराव निंबाळकरास पुनः पत्र लिहिलें कीं, "तुह्मीं एकदम चंद्रसेनावर चाल करून जावें व तुह्मीं सेवेची शर्त करून लढाई द्यावी." त्याच वेळीं महाराजांनीं आपली खासगी फौजही हैबतरावाच्या मदतीस पाठवून दिली. नंतर हैबतराव चंद्रसेनावर एकदम चाल करून गेला. पुढें त्या दोघांची जेऊर येथें फार भयंकर लढाई झाली. ह्या लढाईंत हैबतरावानें आपली शिकस्त केली व चंद्रसेनाचा पुरा नाश करून टाकला. पुढें चंद्रसेन तेथून पळाला तो रहिमतपुरावरून पन्हाळ्यास आला व तेथें कोल्हापुरच्या संभाजी महाराजांस भेटून कांहीं दिवस तो त्यांच्याजवळ राहिला. नंतर बरीच फौज गोळा करून तो बालेघांटीं

१ नगर जिल्ह्याच्या आग्नेयीस जामखेड तालुक्यास लागून नि·

( पुढें चालू. )

निघून गेला, व निजामउल्मुल्क नुक्ताच दक्षिणच्या सुभेदारीवर आला होता त्याला भेटला. त्यानें त्याला चिटकोंढे भालकीकडील ६० लाखांची जहागीर करून दिली. हैबतरावानें आपला पराभव केला ही गोष्ट चंद्रसेनाचे मनास फार लागली. त्यानें त्यावेळीं प्रतिज्ञा केली कीं, "सरलष्करचा पराभव करून त्याचा पुरा नाश करीन तरच अंगावर नवीन वस्त्रें धारण करीन, व शाहूमहाराजांनीं बाळाजी विश्वनाथास माझे स्वाधीन केलें तरच महाराजांस मुजरा करीन!"

अशा निंद्य कृतीनें चंद्रसेनानें आपल्या कुलाच्या उज्ज्वल कीर्तीस कलंक लाविला, व आपल्या स्वर्गस्थ प्रतापी पित्यास, असला निमकहराम कारटा आपल्या पोटीं आला म्हणून अधोमुख केलें. ज्या धनाजीनें शिवाजी महाराज, संभाजी, राजाराम यांच्या कारकीर्दीत मुसलमानांवर आपली तरवार गाजविली, ज्यानें मोंगलांवर स्वाऱ्या करकरून त्यांना अगदीं जेरीस आणिलें, ज्याचा यशोदुंदुभी सर्व हिंदुस्थानभर सारखा गाजत होता व ज्याच्यावर शाहूमहाराजांचा मुख्य इतबार, त्याच धनाजीच्या पुत्रानें मोंगलांचा आश्रित होऊन आपल्या दुःष्कीर्तीचा झेंडा सर्व हिंदुस्थानभर फडकवावा व ज्यांनीं त्याला सेनापतिपद दिलें त्या शाहूमहाराजांवर आपली तरवार उचलावी ह्यापेक्षां मनुष्याच्या आंगची दुसरी नीचता ती कोणती?

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)
जाम हैद्राबादेपर्यंत जो उंचवट्याचा प्रदेश पसरत गेला आहे त्याला बालेघाट असें म्हणतात. ह्या प्रदेशांतून मांजरा नदी वाहते.

१ हें ठिकाण बेदरच्या पूर्वेस २५ मैलांवर आहे.

# भाग तिसरा.

शाहूमहाराज नानांस आपल्या प्रत्यक्ष हाताखालीं घेतात.–नानांस 'सेनाकर्ते' हा किताब मिळतो.–मराठे सरदारांतील गोंधळ.–दमाजी थोरात नानांस कैद करतो व त्यांची सुटका.–नाना कृष्णराव खटावकर याचा पराभव करतात.–ते कान्होजी आंग्र्यास शाहूमहाराजांच्या पक्षास सामील करून घेतात.–नानांस पेशवाईचा अधिकार मिळतो.

चंद्रसेनापासून शाहूमहाराजांनीं नानांचें रक्षण केल्यावर त्यांनीं नानांस आपल्या हाताखालीं घेतलें, व त्यांचीं लोकोत्तर बुद्धि व काम करण्याची अद्वितीय शैली पाहून महाराज फार खुश झाले. पुढें कांहीं दिवसांनीं तर असें झालें कीं, कोणतेंही महत्त्वाचें काम नानांच्या सल्ल्यावांचून होत नाहींसें झालें.

चंद्रसेनाच्या मनांत हैबतराव निंबाळकरास चांगला हात दाखवावयाचा होता. हैबतराव नेहमीं मोंगलांच्या मुलुखावर हल्ले करून त्यांस फार त्रास देत असे, तेव्हां निजामउल्मुल्कानें चंद्रसेनाबरोबर मोठी फौज देऊन त्याला हैबतरावावर पाठवून दिलें. त्यानें ह्या वेळीं आपणाबरोबर सर्जेराव घाटगे व रंभाजी निंबाळकर[1] यांसही घेतलें होतें. पुढें हैबतरावानें चंद्रसेनावर हल्ला केला तेव्हां तो गोदातीर सोडून भीमातीरीं निघून गेला. पुढें हैबतरावानें महाराजांकडे मदतीकरतां लिहिलें, तेव्हां त्यांनीं बाळाजीपंत नानांबरोबर फौज देऊन त्यांना हैबतरावाचे मदतीस पाठवून दिलें, ह्या वेळीं महाराजांकडून नानांस 'सेनाकर्ते' हा बहुमानाचा किताब मिळाला. नाना हैबतरावास येऊन मिळाल्यावर

---

१ चंद्रसेन निजामउल्मुल्कास जाऊन मिळाला तेव्हां त्याच्या, बरोबर हे दोन मराठे सरदारही मोंगलांकडे गेले होते.

त्या दोघांनीं पुरंदरानजीक आपला तळ दिला. पुढें चंद्रसेन त्यांच्यावर चाल करून आला. त्या दोघांची पुरंदरानजीक फार मोठी लढाई झाली. इकडून हैबतराव, नाना आदिकरून वीर व तिकडून चंद्रसेन, रंभाजीराव घाटगे, पांढरे वगैरे सरदार ह्यांनीं आपल्या शौर्याची कमाल केली. ही लढाई एकसारखी दोन प्रहर चालली होती. कोणी कोणास हटेनात. पुढें संध्याकाळ झाली व रात्र पडूं लागली तेव्हां लढाई तहकूब होऊन दोन्ही फौजा आपापल्या गोटांत परत आल्या. पुणें प्रांत त्या वेळीं मोंगलांचे ताब्यांत होता. तेव्हां शाहूमहाराजांची फौज त्या मुलखाचा फार खराबा करील म्हणून चंद्रसेनानें हैबतराव व नाना यांस सालपे* घांटाखालीं मैदानांत लढाईस बोलाविलें, व आपण निरानदीच्या कांठीं तळ देऊन राहिला. तेव्हां हैबतराव व नाना तिकडे गेले. परंतु चंद्रसेनास ह्या लढाईत आपणास यश येणार. नाहीं असें वाटल्यावरून त्यानें शाहूमहाराजांशीं तहाचें बोलणें सुरू केलें. त्यांत विशेष अट अशी होती कीं, "महाराजांचे मनांत बाळाजीस आमचे स्वाधीन करण्याचें नसल तर त्यास निदान आपले पदरीं तरी ठेवूं नये. बाळाजीस काढून टाकल्यावर आह्मीं त्यांच्याशीं वांकडे चालणार नाहीं." त्या वेळीं महाराजांनीं त्यास सांगून पाठविलें कीं, "या गोष्टी घडावयाच्या नाहींत. तुम्हीं आग्रह सोडून देऊन येऊन भेटावें, तुमची सेवा तुम्हीं करावी." परंतु चंद्रसेनास ती गोष्ट मानवली नाहीं, यामुळें तें तहाचें प्रकरण त्या वेळीं तसेंच राहिलें. महाराजांशीं

* हा घांट सातारा जिल्ह्यांत आहे.

लढाई देऊन आपला निभाव लागणार नाहीं असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें होतें तेव्हां तो एकदम चिट-कोंदें-भालकीकडे आपल्या जहागिरीवर निघून गेला. ह्याच वेळीं निजामउल्मुल्कानें पुणें परगण्याची जहागीर रंभाजी निंबाळकार यास दिली ( इ० स० १७१३ ). अशा रीतीनें वरील लढाईचा शेवट झाल्यावर नाना साताऱ्यास महाराजांकडे निघून आले.

निजामउल्मुल्काला दक्षिणेची सुभेदारी मिळाल्यावर त्यानें कोल्हापुरच्या संभाजीस हातीं धरलें. त्यामुळें त्याचा पक्ष ह्या वेळीं फार जोरांत होता, व शाहूमहाराजांच्या पक्षाचें पारडें फारच खालीं बसलें होतें. मराठ्यांपैकीं बरेच सरदार संभाजीच्या पक्षास मिळाले होते व शाहूमहाराजांच्या पक्षाकडे फार थोडे होते; आणि कांहीं कोणत्याच पक्षास न मिळतां आपापल्या मुलखांत स्वतंत्र रीतीनें अंमल करीत होते. परंतु हा सर्व गोंधळ नानांनीं नाहींसा केला. त्याकरितां त्यांस काय काय गोष्टी कराव्या लागल्या त्यांचा इतिहास येणेंप्रमाणें:—

प्रथमतः महाराजांनीं दमाजी[1] थोरातास पादाक्रांत करण्याचा निश्चय केला व नानांबरोबर कांहीं फौज देऊन त्यांना त्याचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिलें. थोरात मोठा कपटी होता. त्यानें ह्या वेळीं नानांस चांगलाच हात दाखविला. आपण लढाईस उभे राहिलों तर आपला निभाव लागणार नाहीं असें त्यास वाटून त्यानें प्रथमतः

---

[1] हा पूर्वी कोल्हापुरच्या संभाजीच्या पक्षाचा होता. पुढें हिंगणगांवच्या गढींत आपलें कायमचें ठाणें ठेवून तो आसपासच्या मुलखांत स्वतंत्र रीतीनें लुटालूट करूं लागला होता.

आपण भ्यालों असें दाखवून तहाचें बोलणें सुरू केलें, व त्याच्या अटी ठरविण्याचे संबंधानें तो नानांस त्यांचे मुलांमाणसांसह आपल्या गढींत घेऊन गेला. ह्या वेळीं नानांबरोबर त्यांचे चिरंजीव बाजी व आपा, अंबाजीपंत पुरंदरे, व पिलाजी जाधव इतकी मंडळी होती. नाना गढींत येतांच दमाजीनें त्या सर्व मंडळीस कैद केलें. त्यानें नानांस असें निक्षून सांगितलें कीं, "तुह्मीं अमुक एक दिवसांचे आंत तुमचे खंडणीबाबत अमुक ऐवज न पटवाल तर तुह्मांस राखेचे तोबरे देऊन ठार मारीन." तेव्हां अंबाजीपंत व पिलाजी जाधव यांनीं थोरातास सांगितलें कीं, "तुह्मी आह्मांस सोडाल तर तुमची खंडणी देऊन आह्मी नानांस सोडवून नेऊं." पुढें थोरातानें त्यांस सोडून दिल्यावर त्यांनीं खंडणीचा पैसा महाराजांपासून घेऊन थोरातास दिला, व नानांची सुटका केली.

नंतर कांहीं दिवसांनीं साताऱ्यास महाराजांनीं निरनिराळ्या दोन स्वाऱ्या करण्याची तयारी केली. एकीचें आधिपत्य बहिरोपंत पिंगळे पेशवे यास दिलें, व त्याला कोंकणांत, कान्होजी आंग्रे संभाजीच्या पक्षाकडील असल्यामुळें शाहूमहाराजांच्या मुलखास उपद्रव देत होता, त्याचें पारिपत्य करण्याकरतां पाठवून दिलें. दुसरीवर नानांस नेमून त्यांना कृष्णराव[1] खटावकरावर पाठवून दिलें.

---

१ कृष्णराव ह्याची मूळची अशी हकीकत सांगतात कीं, औरंगजेब दक्षिणेंत आला त्या वेळीं कृष्णराव मराठ्यांशीं बेइमान होऊन मोंगलांस सामील झाला. त्यानें औरंगजेबास मोठमोठ्या कामांत फार मदत केली. त्याबद्दल बादशाहानें त्याला 'राजे' हा किताब दिला व खटाव

( पुढें चालू )

कृष्णराव गर्वानें इतका फुगून गेला होता कीं, तो नानांशीं सामना देण्याकरतां औंदपर्यंत चाल करून आला. ह्या ठिकाणीं उभयपक्षांची फार मोठी लढाई होऊन कृष्णरावाचा पूर्ण पराभव झाला व त्यास कैद करून नाना सातार्‍यास निघून आले. कृष्णराव महाराजांस शरण आला, तेव्हां त्याच्या अपराधांची क्षमा करून महाराजांनीं त्यास खटाव गांव वंशपरंपरेनें इनाम करून दिला. वरील जयामुळें सातारच्या दरबारीं नानांचें महत्त्व फारच वाढलें.

परंतु कोंकणांत कान्होजी आंग्र्यावर बहिरोपंत पिंगळे यास पाठविलें होतें त्या कामांत त्याला यश आलें नाहीं. कान्होजीनें बहिरोपंताचा लोहगडाजवळ पराभव करून त्यास कैद केलें. नंतर लोहगड, राजगड, तुंग, तिकोना, धनगड, सागरगड, राजमाची वगैरे किल्ले[1] घेऊन थेट सातार्‍यावर चाल करून येण्याचा घाट तो घालूं लागला. त्या वेळीं शाहूमहाराजांना मोठी भीति उत्पन्न झाली. कान्होजीशीं सामना देण्याकरतां त्यांनीं सातारा येथें पुनः फौज गोळा केली व तिच्यावर नानांस मुख्य नेमून त्यांस आंग्र्याचें पारिपत्य करण्याकरतां पाठवून दिलें. नानांनीं होतां होईल तों युक्तीनें तें प्रकरण मिटविण्याचा निश्चय केला. त्यांच्याजवळ त्या वेळीं एकंदर २० हजार

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

गांव वंशपरंपरेनें इनाम देऊन खटाव प्रांताच्या वसुलाचें काम त्याला सांगितलें. कृष्णरावाचे वंशज हल्लीं फार झाले आहेत व त्या सर्वांस "राजे" हा किताब अद्याप चालत आहे. खटाव सातारा जिल्ह्यांत असून तेथें तालुक्याचें ठाणें आहे.

१ हे किल्ले पुणें जिल्ह्यांत व भोर संस्थानांत आहेत.

फौज होती. ते, आंग्रयानें घेतलेले राजमाची, लोहगड वगैरे किल्ले घेत घेत व त्याचीं ठाणीं उठवीत उठवीत व प्रसंगीं त्याच्या लोकांशीं लढाया देत देत कोंकणांत शिरले. कान्होजी त्या वेळीं कुलाबा येथें होता. तेव्हां अवचितगडावरून ते नागोठणें प्रांतांत शिरले. त्या ठिकाणीं आंग्रयाच्या लोकांच्या व त्यांच्या दोन लढाया झाल्या व त्या दोन्हींत आंग्रयाचा पराजय झाला. परंतु नानांच्या मनांतून लढाई करून तें प्रकरण मिटवावयाचें नव्हतें. कारण त्यांनीं विचार केला कीं, तसें केलें तर, जरी या प्रसंगीं कान्होजीचा मोड होऊन तो शरण आला, तथापि एकदां त्याचें मन दूषित झालें ह्मणजे त्याच्या मनांत शाहूमहाराजांविषयीं नेहमीचें वितुष्ट राहून तो नेहमीं त्यांच्या मुलखाला त्रास देईल व नेहमीं त्याच्याशीं लढाई देण्याचे प्रसंग पडतील, आणि त्यामुळें प्रजेचें, मुलखाचें व पैशाचें नुकसान होईल. तेव्हां लढाई तहकूब करून त्यांनीं कान्होजीस निरोप पाठविला कीं, "तुह्मी महाराजांचे पदरचे थोर सुभेदार आहां; तुमचे वडील तुकोजी आंग्रे यांनीं श्रीशिवाजी महाराज यांची एकनिष्ठपणें सेवा करून ते वाढले. असें असून शाहूमहाराज वडील, सिंहासनाचे खावंद, ते राज्यावर आले, राज्य करतात, त्यांशीं दुरोख ( फितूर ) राहून धाकटे भाऊ ( संभाजी राजे कोल्हापुरचे ) यांजकडे मिळून सरकारी तालुके घेतां, व प्रधान ( बहिरोपंत ) यांस धरून कैद केलें, हा सेवकाचा धर्म कीं काय? यांत हरामखोरी घडती. पूर्वीं मातोश्रीस ( ताराबाईस ) इमान दिलें तर त्यांपाशीं रहावें, सरकारी कामांत अमर्यादा करूं नये. किंवा

ते ( ताराबाई, संभाजी राजे वगैरे ) हद्दपार जहालिया-उपरि तख्ताचे खावंद वडील ( शाहूमहाराज ) यांजकडे येऊन भेटून सर्फराजी ( बढती ) करून घ्यावी. हें दोन्हीं-ही करणें नसल्यास, आह्मांस महाराजांनीं पाठविलें आहे. तुह्मांशीं लढाई करून ठाणीं, किल्ले, प्रांत, तुमचे हातून घेणें प्राप्त आहे. लढाई सुरू जहालियावरी महाराजांची कृपा करून घेऊं म्हणाल तरी कदापि गोष्ट घडणार नाहीं. त्याचा विचार करणें असेल तो आधीं करून सांगून पाठ-वावें. महाराजांस श्रीभगवान् अनुकूल होऊन पादशाही मजरबंदींतून त्यांणीं होऊन लावून दिल्हें. राज्य प्राप्त जहालें. आईसाहेब, कनिष्ठ बंधु, पराभव पावले. तेव्हां वडील तख्ताचे खावंद यांस भेटून कृपा संपादावी ही उत्तम गोष्ट आहे. हें करणें नसल्यास सरकारचे मुलखा-ची खरावी किल्ल्यांत राहून करणें ठीक नाहीं. मैदानांत आपलें सामानसुमानसुद्धां तयारी करून लढाईस यावें."

नानांचा अशा तऱ्हेचा बहुसत्य, बहुहित, व बहु-दुराप असा निरोप कान्होजीस जाऊन पोहोंचतांच त्यानें विचार केला कीं, खरोखर रीतीनें पाहूं गेलें तर कोल्हापु-रचे संभाजी महाराज हे राजाराम महाराजांचे पुत्र अस-ल्यामुळें शिवाजी महाराजांच्या गादीवर त्यांचा हक्क पोहों-चत नाहीं; वरें, हल्लींच्या बलाबलावरून पाहूं गेलें तर संभाजी महाराजांचा पक्ष धरून शेवटपर्यंत आपली तड लागेल असेंही चिन्ह दिसत नाहीं; कारण तशा प्रकारचा वकूब व शौर्य त्यांचे अंगीं नाहीं; दुसरी गोष्ट अशी कीं, आह्मीं ताराबाई साहेबांस शपथ दिली होती, परंतु त्याच हल्लीं संभाजीमहाराजांचे कैदेंत आहेत; व त्यांचा पुत्र शिवाजी

वारल्यामुळें, ज्याकरतां त्यांनीं सरदार लोकांकडून शपथा घे-
वविल्या होत्या तें राजकारणही संपलें. तेव्हां आतां आप-
णावर क्रियाभ्रष्टपणाचा आरोप येणार नाहीं. आपण,
गादीचे खरे खरे मालक व चालक शाहूमहाराज यांचें
स्वामित्व कबूल केल्यास त्यांत कोणत्याही रीतीनें हराम-
खोरी पदरीं येणार नाहीं; तेव्हां ही अनायासें चालून आलेली
संधि फुकट दवडूं नये. नंतर त्यानें नानांस उलट निरोप
पाठविला कीं, "आपण सर्व फौज मागें ठेवून कार्याकारण
फौज बरोबर घेऊन किल्ल्यानजीक यावें, म्हणजे भेटी
होऊन व बोलणीं आहेत तीं बोलून विचार
ठरेल तो खरा. आपले विचारें महाराजांची कृपा
होय ऐसें करूं." नंतर नाना कांहीं निवडक लोक
बरोबर घेऊन कुलाब्याच्या किल्ल्यानजीक जाऊन उत-
रले. आंग्रे त्यांस सामोरे गेले व दोघांच्या भेटी मोठ्या
थाटानें झाल्या. पुढें एकमेकांचीं बोलणींचालणीं होऊन
असें ठरलें कीं, " शाहूमहाराजांनीं कान्होजीस कोंकणांत
१६ सवघड व १० अवघड असे किल्ले द्यावे, त्यास सर-
खेल हा किताब देऊन पूर्वीप्रमाणें मराठ्यांच्या आरमारावर
मुख्य नेमावें, कान्होजीनें बहिरोपंत पिंगळे व निळो
बल्लाळ चिटणीस यांस कैदेंतून मुक्त करावें, राजमाची किल्ला
शिवाय करून बाकी शाहूमहाराजांचा घेतलेला मुलूख परत

---

१६ सवघड किल्ल्यांचीं नांवें:—बहिरवगड, कोथळा, वेंकटगड, माणिकगड, मिरगड, सागरगड, रसाळगड, पालगड, खारेपाटण, रायगड, राजापूर, अंबर, साटवली, कामतें, श्रीवर्धन, व मनरंजन. १० अवघड किल्ल्यांचीं नांवें:—खांदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, देवगड, कनकदुर्ग, फत्तेगड, अवचितगड, व यशवंतगड.

द्यावा व संभाजीचा पक्ष सोडून द्यावा. " अशा रीतीचा ठराव करून तो नानांनीं पत्रासोबत साताऱ्यास महाराजांचे संमतीकरतां पाठवून दिला. त्यांत त्यांनीं महाराजांस असें लिहिलें होतें कीं, " आंग्रे याउपरि महाराजांची एकनिष्ठेनें सेवा करून आज्ञेंत चालतात येविशीं खातरजमा शपथ होणें ती जहाली. त्यांस पदाचीं वस्त्रें, बहुमान व त्यांजकडील तालुका ठेवायाचा त्याच्या सनदा पाठवाव्या."
नानांनीं या महत्त्वाच्या प्रकरणाचा अशा उत्कृष्ट रीतीनें शेवट लावलेला पाहून महाराजांस फार आनंद झाला. त्यांनीं कान्होजीकडे असलेला तालुका कायम करून सरखेलपदाचीं वस्त्रें व ठरावाच्या यादी व सनदा देऊन तावडतोब खंडो बल्लाळ चिटणीस यांस कोंकणांत पाठवून दिलें. चिटणीस जाऊन पोहोंचल्यावर नानांनीं मोठा दरबार भरविला व कान्होजीस सरखेलपदाचीं वस्त्रें, व सनदा दिल्या. वरील तहाअन्वयें कान्होजीस जे किल्ले मिळाले त्यांपैकीं श्रीवर्धन वगैरे कांहीं किल्ले जंजिऱ्याचा हबशी बळकावून बसला होता. तेव्हां ते त्याच्यापासून परत घेण्याकरितां कान्होजीनें नानांजवळ मदत मागितली. पुढें नानांच्या मदतीनें हबशीचा पराभव करून कान्होजीनें आपले सर्व किल्ले परत घेतले. नंतर मोठ्या थाटमाटाच्या मेजवान्या होऊन नाना, बहिरोपंत पिंगळे व निळो बल्लाळ यांस बरोबर घेऊन, साताऱ्यास महाराजांचे दर्शनाकरतां निघून आले.

ज्या कान्होजीच्या दराऱ्यामुळें व भीतीमुळें आपल्या राज्यवृद्धीला हें एक मोठें विघ्न आहे असें शाहूमहाराजांस वाटत होतें; फार काय सांगावें, ज्यानें साताऱ्यावर

स्वारी करण्याचा घाट घातल्यामुळें कदाचित् सातारच्या गादीस धक्का पोहोंचेल अशी बळकट भीति त्यांना पडली होती; ज्यानें प्रत्यक्ष पेशव्यास आपल्या कैदेंत ठेविलें होतें; त्या बलिष्ठ सरदारास, पैसा व फौज यांचा नाश न करतां युक्तीच्या मार्गाचें अवलंबन करून व मुत्सद्दीपणाची अक्कल लढवून ज्या पुरुषानें शाहूमहाराजांच्या पक्षास सामील करून घेतलें व अशा रीतीनें महाराजांच्या डळमळीत राज्यरूपी इमारतीस कान्होजीसारखा भक्कम आधारस्तंभ देऊन ती बळकट केली, त्याची कर्तबगारी, त्याचें चातुर्य, व त्याची हुशारी यांचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे! महाराजांची मर्जी नानांवर सुप्रसन्न झाली. बहिरोपंत पिंगळे पेशवे यास त्या स्वारींत अपयश आलें, शिवाय तो कान्होजीचे हातीं सांपडून त्याच्या कैदेंतही पडला, ह्यामुळें महाराजांची त्याच्यावर मोठी इतराजी झाली. तो पेशवे पदास गैरलायक मनुष्य आहे असें महाराजांस वाटल्यावरून त्यांनीं त्याला त्या कामावरून दूर केलें, व नानांनीं त्या वेळेपर्यंत जीं महत्त्वाचीं कामें केलीं होतीं तीं मनांत आणून व पुढेंही आपणास त्यांच्या हातून पुष्कळ कामें करून घेणें आहे या गोष्टीकडे लक्ष देऊन एक बडा दरबार भरविला व नानांस मुख्यप्रधानपदाचीं वस्त्रें, [1] बादली, [2] सहा [3] सणगें [4] व जवाहीर, शिरपेंच, तुरा, कंठी, चौकडा, ढालतरवार, शिक्केकटार, व चौघडा, साहेबी नौबत, हत्ती, घोडे, जरीपटका याप्रमाणें देऊन त्यांना महाराजांनीं आपला पेशवा अथवा मुख्य प्रधान नेमिलें, व त्याच वेळीं अंबाजीपंत पुरंदरे

१ चादर; २ मंदील; ३ जामवार; ४ पटका; ५ चादर बादली; ६ किनखाप.

यांस पेशव्यांच्या मुतालकीचीं वस्त्रें दिलीं. वरील वर्तमान शके १६३९ ह्मणजे इ० स० १७१४त घडलें. नानांस अभय देऊन चंद्रसेनापासून महाराजांनीं त्यांचें संरक्षण केल्यामुळें शेवटीं चंद्रसेनासारखा बलिष्ठ सेनापति महाराजांस सोडून निजामउल्मुल्कास जाऊन मिळाला, यामुळें महाराजांस त्या वेळीं फार दुःख झालें असेल, व एका साधारण कारकुनाकरतां केवळ वचनभंगाच्या भीतीनें चंद्रसेनासारखा शूर सरदार आपणास सोडून गेला या कारणा-मुळें त्यांचें मन त्या वेळीं उदासीन झालें असेल; परंतु नानांनीं पुढें जीं हीं मोठमोठीं महत्त्वाचीं कामें केलीं तीं पाहून, चंद्र-सेन गेला तथापि त्यापासून आपलें कांहींच नुकसान झालें नाहीं इतकेंच नव्हे, तर चंद्रसेनापेक्षांही पराक्रमानें कांकणभर ज्यास्त असा पुरुष आपणास त्याच्या ऐवजीं मिळाला असें त्यांस वाटून ह्या वेळीं फार आनंद झाला असेल.

मनुष्याच्या भाग्याची गति कांहीं विचित्र असते. ज्या वेळीं नाना, आपला हबशी नाश करील या भीतीनें आपलें कुटुंब बरोबर घेऊन श्रीवर्धनाहून निघाले व अंबा-जीपंताच्या साह्यानें साताऱ्यास एकादी लहानशी नोकरी मिळविण्याच्या उद्देशानें आले, त्या वेळीं, पुढें सहा वर्षांनीं आपण अशा वैभवाच्या शिखरास जाऊन पोहोंचूं अशी कल्पना तरी त्यांच्या मनांत आली असेल काय! यावरून अशीही गोष्ट सिद्ध होते कीं, "नर जो अपनी करनी करे तो नरका नारायन होय" हें साधुवर्य कबीर यांचें वाक्य अक्षरशः खरें आहे!

# भाग चवथा.

नानांस पेशवाईचा अधिकार मिळाला त्या वेळीं सातारच्या राज्याची स्थिति.—दमाजी थोराताचा नाश, व नानांस सचिवाकडून पुरंदरचा किल्ला बक्षीस मिळतो.—नाना बाजी कदम याच्यापासून पुणें प्रांत घेतात.—नानांच्या सल्यानें शाहूमहाराज आपल्या मुलुखाचा बंदोबस्त करतात.—नानांस दिल्लीस कां जावें लागतें व तेथें त्यांनीं काय काय गोष्टी केल्या त्याची हकीकत.—नाना सातान्यास परत येतात व जमाबंदीची शिस्त लावतात.—त्यांचा मृत्यु.

इ० स० १७१४त नानांस पेशवाईचा अधिकार प्राप्त झाला, त्या वेळीं शाहूमहाराजांचा पक्ष बराच जोरांत आला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचें बहुतेक श्रेय नानांसच देणें योग्य आहे. कारण त्यांनीं कान्होजीस महाराजांचे पक्षास सामील करून घेतल्यामुळें कोंकणाच्या बाजूनें परशत्रूची भीति नाहींशी झाली होती. त्याचप्रमाणें कृष्णराव खटावकराचा पराजय केल्यामुळें महाराष्ट्रांतही त्यांचा बराच दरारा बसला होता, व त्याचा बराच भाग त्यांच्या खास अमलाखालीं आला होता.

मागें सांगितल्याप्रमाणें[1] दमाजी थोरातानें नानांजवळ दगाबाजी केल्यामुळें रोख पैसा भरून शाहूमहाराजांनीं नानांची सुटका केल्यानंतर त्याला जिंकण्याचें काम महाराजांनीं सचिवास सांगितलें. तेव्हां त्याचा कारभारी राझेकर यानें थोराताशीं लढाई सुरू केली. परंतु एके प्रसंगीं थोरातानें त्याचा पराभव करून त्याला व त्याचा धनी नारो शंकर यांस कैद केलें, व हिंगणगांवच्या गढींत नेऊन ठेवलें. पुढें कांहीं दिवसांनीं शाहूमहाराजांची स्वारी जेजू-

१ मागें पान १८ मधील टीप पहा,

रीस देवदर्शनाकरतां गेली होती. तेव्हां त्यांनीं थोरातास आपल्या भेटीस बोलाविलें. थोरात येऊन भेटल्यावर महाराजांनीं त्याला सांगितलें कीं, "तुह्मीं यापुढें बंड वगैरे कांहीं एक न करतां श्रीपाशीं बेलभंडार देऊन आमचे पदरीं रहावें. तुह्मांस सरदारी व कांहीं मुलूख देऊन आह्मी उत्तम प्रकारें ठेवूं." थोरात या वेळीं इतका चढून गेला होता कीं, आपण कोणापुढें आलों आहों याचेंही त्यास भान राहिलें नाहीं ! त्यानें महाराजांस सांगितलें कीं, "बेलभंडार कशाला पाहिजे? भंडार ह्मणजे आमची नित्य खाण्याची हळद ! बेल तरी झाडाचा पाला !!" त्याचें हें उद्धटपणाचें उत्तर ऐकून महाराजांस फार राग आला. परंतु अभय देऊन महाराजांनीं त्याला बोलाविलें होतें म्हणून त्या वेळीं त्याला त्यांनीं सोडून दिलें. पुढें स्वारी साताऱ्यास परत आल्यावर नानांच्या मदतीस मानसिंग[1] मोरे सेनापति यास देऊन त्यांनीं त्यांस थोरातावर पाठवून दिलें. आपण थोरातावर एकदम चाल करून गेलों तर तो दुष्ट सचिवाचा व त्याच्या कारभाऱ्याचा कदाचित् घात करील अशी नानांस मोठी भीति पडली. तेव्हां प्रथमतः लढाईचा वगैरे कांहीं एक रोंख न दाखवितां त्यांनीं पिलाजी जाधव यास सामोपचारानें थोराताकडे पाठवून दिलें, व त्यानें मागितलेला पैसा भरून त्या दोघांची सुटका केली. पुढें त्याच्याशीं लढाई सुरू करून थोड्याच वेळांत त्यांनीं त्याला हतवीर्य करून सोडलें. थोरात आपल्या गढींत जाऊन बसला तेव्हां नानांनीं तिला वेढा देऊन तोफा

---

१ चंद्रसेन मोंगलांस जाऊन मिळाल्यावर शाहूमहाराजांनीं मानसिंग मोरे यास आपला सेनापति नेमिलें.

सुरू केल्या व ती जमीनदोस्त करून टाकली, आणि थोरातास कैद करून ते साताऱ्यास आले. थोरात मरेपर्यंत कैदेंत होता.

नारो शंकर याची नानांनीं सुटका केल्यामुळें त्याची मातुश्री येसूबाई इनें कृतज्ञतापूर्वक नानांस पुणें प्रांतांतील सचिवाचे सर्व हक्क दिले. त्याचप्रमाणें नानांची मुलेंमाणसें त्या वेळीं सासवड येथें होतीं तेव्हां संकटसमयीं त्यांच्या बचावाकरितां तिनें आपला पुरंदरचा किल्ला नानांस दिला. परंतु महाराजांचे आज्ञेशिवाय नानांस ती देणगी घेतां येईना ह्मणून त्यांनीं महाराजांस अशी विनंति केली कीं, " प्रसंगविशेषीं माझ्या मुलांमाणसांच्या संरक्षणाकरतां महाराजांनीं मला पुरंदरचा किल्ला दिला तर बरें होईल." त्यावरून, व नानांस तो किल्ला देण्यास माझी कबुली आहे असें येसूबाईनें महाराजांस सांगितल्यावरून, महाराजांनीं लगेच तो किल्ला नानांस दिला. नानांनीं महाराजापासून हा किल्ला घेतला त्या संबंधानें त्यांच्यावर डफ साहेबांनीं बराच मोठा आक्षेप घेतला आहे. ते असें ह्मणतात कीं, "ब्राह्मणांनीं कावेबाजपणानें ज्या सांखळीनें पुढें शाहूमहाराजांच्या अधिकाराला जखडून टाकलें व ज्या सांखळीच्या योगानें त्यांच्यामागून साताऱ्च्या गादीवर जे राजे बसले त्यांना केवळ नामधारी व्हावें लागलें, तिचा हा पहिला दुवा शाहूमहाराजांनीं स्वतः घडवून दिला." एवढ्याशा लहान व एवढ्याच देणगीचा डफ साहेबांस एवढा मोठा बाऊ कां वाटला असावा हें समजत नाहीं ! एखाद्या सरदारानें मर्दुमकीचें काम केल्यास त्याला जहागीर वगैरे देण्याची पद्धत शिवाजी महाराजांपासून सुरू होती, व त्याच पद्धतीवर पेशवे, सचिव, प्रति-

निधि, सेनापति व दुसरे सरदार यांस त्या वेळीं जहागिरी करून दिलेल्या होत्या. नानांनीं मोठ्या युक्तीनें थोरातासारख्या बलिष्ठ व दगेबाज शत्रूपासून सचिवाची सुटका केली, व पुढें त्याचा पराभव करून त्याच्या जुलमापासून प्रजेची मुक्तता केली, ह्या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल त्यांना सचिवाच्या आईनें कृतज्ञतापूर्वक पुरंदरचा किल्ला दिला, व त्या गोष्टीस महाराजांनीं आपलें अनुमोदन दिलें, ह्यांत महाराजांनीं आपल्या अधिकारास विशेष अपायकारक अशी कोणती गोष्ट केली व ह्या ठिकाणीं ब्राह्मणांनीं आपला कावेबाजपणा कसा लढविला तें कळत नाहीं! असो. वरील वर्तमान इ० स० १७१४ त घडलें.

ह्या वेळीं पुणें प्रांत मोंगलांचा सरदार बाजी कदम याच्या ताब्यांत होता. पुढें तो प्रांत नानांनीं आपल्याकडे घेण्याचा विचार केला, व बाजी कदम यास अनुकूल करून घेऊन त्यांनीं तो त्याच्यापासून घेतला. परंतु त्या वेळीं त्यांना बाजी कदम याच्याशीं अशी एक अट कबूल करावी लागली कीं, "रंभाजी निंबाळकर याचे हक्क व मालमत्ता यांस आम्ही कोणत्याही तऱ्हेनें तोशीस लागूं देणार नाहीं." नानांच्या हातीं पुणें प्रांताचा अधिकार येतांच प्रथमतः त्यांनीं त्या प्रांतांत पूर्वी चोरटे लोकांचा जो अतिशय उपद्रव होता त्याचा नीट बंदोबस्त केला. त्याच-प्रमाणें त्यांनीं, पूर्वींची वसूल घेण्याची रीति बंद केली, व कमी धाऱ्यानें जमिनी देऊन त्या प्रांताची लागवड कर-ण्याविषयीं हजारों लोकांस उत्तेजन दिलें. यामुळें पुढें त्या प्रांताचा वसूल वाढून पुष्कळ पडीत जमीन लागवडीस आली.

नानांचें महत्त्व दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊं लागलें व सातारच्या दरबारीं त्यांच्या सल्ल्यावांचून कोणतीच गोष्ट होत नाहींशी झाली. होतां होईल तोंपर्यंत सामदानानें कार्यभाग उरकून घेणें ही गोष्ट शाहूमहाराजांस फार आवडत असे व नानांनींही तोच कित्ता गिरविला होता.

ह्या वेळीं दिल्लीच्या दरबारांत मोठी गडबड उडून गेली होती. पुढें नानांस दिल्लीस कां जावें लागलें व तेथें त्यांनीं काय काय महत्त्वाच्या गोष्टी केल्या याचा इतिहास स्पष्टपणें ध्यानांत येण्यास दिल्लीच्या दरबारीं त्या वेळीं चाललेल्या गोष्टींची साग्र हकीकत देणें अवश्य आहे. त्याचा प्रकार असा:—

इ० स० १७१३त फिरुकशियर तख्तनशीन झाल्यावर त्यानें आपली वजिरी सय्यद बंधूंपैकीं वडील अबदुल्ला यास दिली व धाकटा हुसेनअल्ली यास आपला सेनापति नेमिलें हें मागें सांगितलेंच आहे. पुढें थोडक्याच वेळांत बादशाहाच्या मनांत सय्यदांची दराऱ्याची वर्तणूक पाहून त्यांच्याविषयीं द्वेषभाव उत्पन्न झाला. बादशाहाचा स्वभाव फार हलकट होता. त्यानें ढाका शहरच्या काजीस "मीरजुमला" असा किताब दिला व त्याच्याच तंत्रानें तो वागूं लागला. पुढें सय्यद बंधूंची फाटाफूट करून त्यांस दुर्बल करावें व नंतर त्यांचा घात करावा असा विचार बादशाहाच्या गुप्त दरबारांत ठरला. तेव्हां बादशाहानें, मारवाडचा राजा अजितसिंग याच्याशीं कांहीं कारणामुळें लढाई उपस्थित झाल्यामुळें हुसेनअल्लीस त्याच्यावर पाठविलें, व आंतून अजितसिंगास असें कळविलें कीं, "तुह्मी हुसेनअल्लीस लढाईंत चांगला हात दाखवावा व त्याचा

पुरा फडशा करून टाकावा. या गोष्टीनें मला जितकें समाधान होईल तितकें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें होणार नाहीं." आपण फार दिवस बाहेर राहिलों तर बादशाहा आपणाविरुद्ध कारस्थानें चालवील हें हुसेन ओळखून होता. तेव्हां त्यानें लढाई न करतां अजितासिंगास अनुकूल असा त्याच्याशीं तह केला व तो दिल्लीस परत आला.

पुढें बादशाहाच्या एकंदर कृतीवरून, आपला घात करण्याचा विचार तो करीत आहे अशी सय्यदांची खात्री झाली, व एके दिवशीं आपल्या वाड्यासभोंवतीं आपलें लष्कर गोळा करून, आह्मी दरबारास येत नाहीं ह्मणून त्यांनीं बादशाहास निरोप पाठविला. त्या वेळीं दिल्लींत मोठा गोंधळ माजला व पुष्कळ लोक प्राणास मुकले. पुढें तडजोड होऊन त्या उभयपक्षांत असा ठराव झाला कीं, "बादशाहानें मीरजुमला यास दरबारांतून काढून टाकावें, अबदुल्लाखान यानें पूर्वीप्रमाणें आपलें वजिरीचें काम पहावें, व हुसेनअल्लीनें दक्षिणच्या सहा सुभ्यांचा अधिकार पाहण्याकरतां तावडतोब निघून जावें."

अशा रीतीनें इ० स० १७१६ च्या प्रारंभीं हुसेनअल्ली दक्षिणेंत येण्याकरतां निघाला. परंतु येतांना त्यानें बादशाहास असें निक्षून सांगितलें कीं, "माझ्या भावाच्या अधिकाराची घालमेल चालली आहे असें मला कळलें तर मी वीस दिवसांत दिल्लीस परत येईन!"

अशा रीतीनें सय्यदांची फाटाफूट करूनच बादशाहा स्वस्थ बसला नाहीं. गुजराथचा सुभेदार दाऊदखान[1]

---

१ दाऊदखान पन्नी हा झुलपिकारखानाचा स्नेही होता व झुलपि-

( पुढें चालू )

पत्नी याचें व हुसेनअल्लीचें फार वैमनस्य होतें. त्याचा बादशाहानें असा निरोप पाठविला कीं, " तुम्हीं एकदम खानदेशांत जावें, जेवढें लष्कर जमा करतां येईल तेवढें करावें, मराठे लोकांशीं चालेल तेवढें वजन चालवावें, व हुसेनअल्लीस मदत करण्याचें मिष दाखवून त्यास ठार मारावें. ही कामगिरी तुम्हीं बजावल्यास तुह्मांस दक्षिण- च्या सहा सुभ्यांची सुभेदारी मिळेल." पुढें त्या दोघांची फार मोठी लढाई झाली. परंतु दाऊदखानास गोळी लागून तो लढाईत पडला, त्यामुळें त्याचें सैन्य पळून गेलें व हुसेनअल्लीस जय मिळाला.

हुसेनअल्ली दक्षिणेंत आल्यावर दिल्ली येथें बादशाहा- च्या गुप्त दरबारांत सय्यदांविरुद्ध पुनः मोठ्या ज्यारीनें कारस्थानें सुरू झालीं. पुढें ही बातमी हुसेनास समजली त्या वेळीं तो अगदीं गोंधळून गेला. कारण दक्षिणेंत मरा- ठ्यांनीं मोंगलांच्या मुलखावर स्वाऱ्या करकरून त्याला अगदीं जेरीस आणिलें होतें, व उत्तरहिंदुस्थानांत दिल्ली येथें त्याचा प्राण घेण्याचा विचार चालला होता. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपण काय करावें हें त्यास सुचेना. शेवटीं शंकराजी मल्हार म्हणून एक

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

कारखानास सय्यद बंधूंच्या सांगण्यावरून इ० स० १७१३ त फिरुक्शियरनें ठार मारलें होतें; त्यामुळें दाऊदखान सय्यदांविषयीं मनांत जळत होता.

१ हा पूर्वी शिवाजी महाराजांजवळ एक कारकून होता. राजारा- माचे कारकीर्दीत त्याला सचिवपद प्राप्त झालें. पुढें राजारामास

( पुढें चालू )

त्याच्या पदरीं मनुष्य होता त्यास त्यानें असें सांगितलें कीं, " या एकंदर काहुरांतून कसें सुटावें याचें मला मोठें कोडें पडलें आहे. याकरतां तुम्हीं येथें सुभ्याचें काम पाहून बंदोबस्त राखावा. आम्ही फौज घेऊन जातों व अगोदर दिल्लीचा बखेडा मोडतों." तेव्हां शंकराजी मल्हार यानें त्यास अशी मसलत दिली कीं, "शाहूराजे पादशाहींतून सुटून आले, आपले सर्व दौलतीचा बंदोबस्त केला, मातबर सरदार, कर्ते माणसें व मुत्सद्दी कार्यकर्ते जमविले, फौज, पागा, कारखाने मोडलेले जमविले, आणि फौज, सुभे मोठमोठे पाठवून मुलूख अंमल काबीज केला, त्यांशीं सख्य करावें. म्हणजे ते सहजच आपले सुभ्यांत उपद्रव करणार नाहींत. त्यांची फौज व लोक मदतीस बरोबर घेऊन जावें. म्हणजे थोर मसलत व मोठीं कार्यें घडून येतील. नाहीं तरी मसलत बहुत दुर्घट आहे." हुसेनअलीस ही मसलत पसंत पडून त्यानें लगेच शंकराजी मल्हार यास सांगितलें कीं, "तुम्ही पूर्वींपासून महाराजांचे पदरचे आहां, ह्याकरितां तुम्हींच या कामास जाऊन तह ठरवावा, व ते आपल्या मदतीस

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

मोंगलांनीं जिंजी येथें कोंडून धरलें होतें तेव्हां त्रासून तो काशीयात्रेस निघून गेला. तेथें कांहीं वर्षें घालविल्यावर त्याला तो एकांतवास दुःसह होऊं लागला; व पुनः आपल्या हातून होईल ती देशसेवा करावी या उद्देशानें दक्षिणेंत येण्याकरतां तो निघाला. त्याच वेळेच्या सुमारास हुसेनअल्लीही दक्षिणेंत येण्याकरतां निघाला व त्यानें आग्रह केल्यावरून त्याच्या पदरीं नोकरी धरून तो दक्षिणेंत आला.

पन्नास हजार फौज देतील असें करावें. त्या फौजेचा खर्च देऊन येथल्या येथें ज्या गोष्टी करण्याजोग्या असतील त्या तुह्मीं आपल्या मुखत्यारीनें करून टाकाव्या, व दिल्लीस बादशाहाकडून करवून देण्यासारख्या ज्या अटी असतील त्या कबूल कराव्या, आणि दक्षिणेंत आमच्या तर्फेचा जो कामगार राहील त्यास मदत करावी, असें ठरवावें." शंकराजी मल्हार यास, आपणाला पुनः आपल्या देशाची सेवा करण्याचा हा अयाचित प्रसंग आला यामुळें मोठा आनंद झाला. नंतर हुसेनअल्लीनें त्याच्याबरोबर लवाजमा, हत्तीघोडे, व ५००० फौज देऊन शिवाय शाहूमहाराजांस पोषाख, वस्त्रें, हत्तीघोडे, जवाहीर, वगैरे देऊन त्यास रवाना केलें. शंकराजी मल्हार साताऱ्यास आल्यावर शाहूमहाराज, हे आपले पूर्वीचे सचिव सय्यदाकडून वकिलीकरितां येत आहेत ही गोष्ट लक्षांत आणून, आपल्या अष्टप्रधानांसह त्यास सामोरे गेले. उभयतांच्या मोठ्या थाटानें भेटी झाल्या, व शंकराजी मल्हार यास लवाजम्यासुद्धां राहण्यास निराळी जागा नेमून देऊन त्याचा सर्व खर्च देण्याची आपल्या कारकुनास महाराजांनीं आज्ञा केली. पुढें हुसेनअल्लीनें दिलेली नजर महाराजांस देऊन शंकराजी मल्हार यानें विनंती केली कीं, "आह्मीं पूर्वीपासून पदरचे, चंदी ( जिंजी ) मुक्कामीं बहुत सेवा केली. चंदीचे मुकामींहून महाराजांची ( राजाराम महाराजांची ) आज्ञा घेऊन श्री–काशीवासास गेलों. तेथें सय्यदांनीं आग्रह करून दक्षिणेंत बरोबर आणिलें. महाराजही दक्षिणेंत पादशाहापासून आले. महाराजांचा प्रताप व गुणकीर्ति थोरले महाराजांचे रीती-

प्रमाणें. त्या धारियानें चालणें ऐकिलें, तेव्हां स्वामींचे पाय ते आमची काशीच होय. तें दर्शन होईल ह्मणून या प्रांतीं पुनः आलों. हल्लीं राजकारण उत्पन्न झालें आहे त्यांत स्वामींची सेवा पूर्वीं केली हल्लींही करून दाखवावी म्हणून सय्यदास सल्ला देऊन दर्शनास आलों. महाराजांचे गुण व प्रताप ऐकिले तसेच आहेत. थोर थोर मातबर कर्ती माणसें व अष्टप्रधान यांचा संग्रह केला; फौज, पागा, कारखाने, सर्व हुशार असोन थोरले महाराजांचे धाऱ्यानें दौलत चालविली आहे. श्रीकृपें इच्छिलें तें घडून येतें. हें पाहून बहुत संतोष पावून कृतार्थ झालों." शाहूमहाराजांनीं-ही शंकराजी मल्हार याचा मोठा गौरव केला. आणि ह्मणाले, "तुम्हीं या राज्याचे वृद्धीविषयीं थोरले महाराज व काकासाहेब यांपाशीं बहुत सेवा केली. महाराजांनीं अशींच पोक्त कर्ती माणसें समयानुसार मोठीं कामें करावया-जोगीं संग्रहीं बाळगलीं. तुम्हीं पूर्वीं सेवा व पराक्रम केले ते सर्व ऐकण्यांत आले आहेत. तुम्हीं महाराजांपाशीं मान्य होतां, त्याप्रमाणें आह्मांस मान्य आहां. अनायासें येथें आलां, आमचें मानस तें घडून आलें. याउपरि आह्मांपाशीं राहून पूर्ववत् सेवा करावी. तुह्मांस पाहून संतोष झाला." नंतर शंकराजीपंतांनीं "कोठेंही असलों तरी महाराजांची सेवा करून दाखवावी व मराठी राज्याची वृद्धि व्हावी हेंच यावत्प्राण इच्छितों," असें बोलून हुसेनअल्लीचीं सर्व बोलणीं सांगितली. पुढें महाराजांनीं सय्यदांचे मदतीस पन्नास हजार फौज देऊन त्यांस खर्चाकरितां रोज पन्नास हजार रुपयेप्रमाणें दरमहा १९ लाख रुपये द्यावे असें ठरवून मतलबाची यादी करून दिली त्याचा तपशील:—

१ स्वराज्य कैलासवासी स्वामींचे वेळेप्रमाणें रायगड व वरकड कोट देखील करून घेणें. ठाणीं मागून घेणें.
१ खटाव, १ आक्कुज, १ कासेगांव, १ मंगळवेढें, १ मिरज, १ पेढगांव, १ जुन्नर किल्लेसमेत, १ चौल समेत किल्ले, १ सांगोलें, १ नाझरें, १ चाकण,
१ बेळगांव व कल्याण भिंवडी समेत किल्ले.
१ त्रिंबक मागोन घेणें.
१ तोफे ( फा ! ) दर संस्थानीं घेतील त्यांची चौथाई करून घेणें.
१ चांदाचें राज्य कान्होजी भोंसले यांनीं साधिलें आहे तें स्वराज्यांत करून घेणें.
१ सहा सुभे खेरीज गुजराथ, माळवा साधेल तेथवर साधणें.
१ मातुश्री ( येसूबाई ), मदनसिंग देखील कबिले व दुर्गाबाई सेवक लोक मागोन घेणें.
१ पेशजीं मतलब लिहून दिले आहेत त्यांचे फर्मान सनदा करून घेऊन येणें.
१ कोंकणपट्टी देखील राजापुरी चौथ, सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड साधेल त्याचे फर्मान पृथकाकारें करून घेणें.
१ सरदेशमुखी इनाम, दर महालास एक गांव करून घेणें.
१ चंदी प्रांतीं राज्य, गडकोट देखील करून घेणें.
१ जयसिंग पालकर येतील तरी मागून घेणें[1].

याप्रमाणें यादी करून दिली. त्याचप्रमाणें स्वराज्यांत मोंगलांचीं ठाणीं व सुभे होते ते काढून टाकून सर्व बंदोबस्त आमचे स्वाधीन करावा ह्मणून सांगितलें. शंकरा-

---

१ छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र–का० सं०.

जी मल्हार यानें हा सर्व मजकूर हुसेनअल्लीस कळविला तेव्हां त्यानें त्यास आपली मंजुरी दिली. याप्रमाणें हातीं घेतलेल्या कामाचा योग्य रीतीनें निकाल लावून शंकराजी मल्हार औरंगाबादेस निघून गेला.

नंतर शाहूमहाराजांनीं नानांच्या हाताखालीं सेनापति मानसिंग मोरे, सेनासाहेबसुभे परसोजी भोंसले, संताजी भोंसले, विश्वासराव पवार वगैरे सरदार व पन्नास हजार फौज देऊन त्यांना औरंगाबादेस हुसेन-अल्लीच्या मदतीस पाठवून दिलें. त्या ठिकाणीं हुसेन-अल्लीचीही पन्नास हजार फौज होती. नंतर ही एक लाख फौज दर कूच दर मजल करीत दिल्लीस येऊन पोहोंचली. त्या ठिकाणीं बादशाहाच्या पक्षाच्या मंडळींनेंही फौज गोळा केली होती. पुढें त्यांनीं सय्यदांच्या सैन्यावर हल्ला केला. तेव्हां सय्यदांस मोठा राग येऊन त्यांनीं आपली फौज शहरांत नेली. त्या वेळीं बादशाहा भीतीनें जनानखान्यांत जाऊन लपून बसला. सय्यदांनीं त्यास तेथून धरून आणून गुप्तपणें प्रथमतः त्याचे डोळे काढले व मागून त्यास ठार मारून टाकलें ( इ० स० १७१९ ). पुढें त्यांनीं रफी उद्दर्जात व रफी उद्दवला अशा दोघां मुलांस गादी-वर बसविलें, परंतु ते दोघे सात महिन्यांचे आंतच रोग होऊन मरण पावले. नंतर त्यांनीं मोअज्जीमाचा नातू व जाहांदरशाहाचा पुत्र रोषन् अखत्यार यास महंमद-शाहा असा किताब देऊन त्याला तख्तावर बसविलें, व राज्याचा सर्व कारभार स्वतः पाहूं लागले.

महंमदशाहा गादीवर बसेपर्यंत नाना आपल्या फौजे-सह दिल्लीसच होते. पुढें एके दिवशीं नाना, बाळाजी

महादेव भानू व संताजी भोंसले यांस छावणीच्या रक्षणाचें काम सांगून सय्यदांबरोबर बादशाहाचे भेटीस गेले असतां मागें दिल्लींतील लोकांनीं बंडावा करून मराठ्यांचे छावणीवर हल्ला केला. तेव्हां माणिक चौकांत मोठी चकमक झडून उभयपक्षांचे बरेच लोक पडले. मराठ्यांचे एकंदर १५०० लोक पडले व त्या गर्दींत भानू व संताजी दोघेही मारले गेले. भानूंच्या मरणाबद्दल दुसरी एक दंतकथा आहे ती अशी:—

" एके दिवशीं बादशाहानें मोठा दरबार भरवून नानांच्या स्वाधीन चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा केल्या. ती गोष्ट बादशाहाच्या मंडळीस न आवडून त्यांनीं त्या सनदा, नानांस ठार मारून परत घेण्याचा निश्चय केला; व नाना बाहेर पडले कीं त्यांच्यावर छापा घालण्याची त्यांनीं तयारी केली. दरबारी मंडळीचें तें कपट नानांच्या तत्काळ ध्यानांत आलें. नंतर जवळ भानू होते त्यांस त्यांनीं विचारिलें कीं, " पुढें मसलत कशी ? " फडनवीस म्हणाले, " ठीक आहे. मी तुमचे पालखींत बसून जातों. तुम्हीं सनदा काखेस मारून दुसऱ्या वाटेनें गोटांत जाणें." नानांस ही मसलत पसंत पडून ते सनदा घेऊन आडमार्गानें गोटांत सुरक्षित येऊन पोहोंचले. फडनवीस पालखींत बसून जात असतां हेच पेशवे असें समजून दिल्लींतील लोकांनीं त्यांचेवर छापा घातला व त्यांस ठार मारिलें. ह्या गोष्टीस मराठी बखरींत कोठें आधार मिळत नाहीं. परंतु जर ही गोष्ट खरी असेल तर अशा प्रकारची स्वामिभक्तीचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत फारच थोडीं सांपडतील !

वर सांगितलेल्या गर्दीत मराठ्यांचे जे १९०० लोक पडले त्यांबद्दलचें सर्व नुकसान सय्यदांनीं नानांस भरून दिलें; त्याचप्रमाणें त्यांनीं शाहूमहाराजांच्या मातुश्री येसूबाई, मदनसिंग व दुसरीं कुटुंबाचीं माणसें हीं सर्व नानांच्या स्वाधीन केलीं; चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा बादशाहाच्या सहीशिक्क्यानिशीं हवालीं केल्या; भिमेच्या उत्तरेकडील मुलुखाबद्दल तायवड्यापासून मछिंद्रगडपर्यंत जे किल्ले आहेत त्यांच्या पलीकडील थेट पंढरपूरपर्यंतचा मुलूख शाहूमहाराजांस दिला; त्याचप्रमाणें येरला, माण व निरा या नद्या ज्या प्रदेशांतून वाहतात तो सर्व प्रदेश सय्यदांनीं महाराजांस दिला. कान्होजी भोंसले यानें वऱ्हाडांत जो मुलूख काबीज केला होता तो व गुजराथ आणि माळवा या प्रांतांत चौथाई बसविण्याचा हक्क यांचीही सनद या वेळीं मराठ्यांस मिळाली असें म्हणतात. परंतु सय्यदांनीं जरी कदाचित् ही सनद तुम्हांस देऊं असें नानांस त्या वेळीं अभिवचन दिलें असलें, व जरी नाना दक्षिणेंत निघून आले त्या वेळीं त्यांनीं ती सनद आणण्याकरतां देवराव हिंगणे[1] यांस दिल्लीच्या दरबारीं ठेविलें असलें, तरी पुढील एकंदर हकीकतीवरून ती सनद त्या वेळीं मराठ्यांस मिळाली नाहीं असें सिद्ध होतें. शिवाय बादशाहाच्या स्वदस्तुरच्या ज्या सनदा आहेत त्यांतही ही सनद कोठें उपलब्ध नाहीं. शाहूमहाराजांच्या मागण्यांपैकीं ज्या बाबी त्यांना मिळाल्या

---

१ हा, पेशवाईंत जे ३॥ शहाणे प्रसिद्ध होऊन गेले त्यांपैकीं एक होय. ३॥ शहाणे येणेंप्रमाणें:–१ सखाराम बापू; १ देवराव हिंगणे; १ विठ्ठल सुंदर ( हैदराबादचे दिवाण ); ॥ नाना फडनवीस.

नाहींत त्या म्हटल्या म्हणजे, १ खानदेशांतील मराठ्यांचीं ठाणीं, २ त्रिंबकचा किल्ला व त्याच्या आसपासचा मुलूख, व ३ वर्धा व तुंगभद्रा या नद्यांच्या दक्षिणेस मराठ्यांनीं जो मुलूख जिंकून घेतला होता तो, ह्या होत.

वर सांगितल्याप्रमाणें ठराव करून घेऊन व चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा घेऊन व शाहू महाराजांची मातुश्री व दुसरी मंडळी दिल्लीस अटकेंत होती ती बरोबर घेऊन, नाना महाराजांच्या भेटीस येण्याकरतां निघाले. वाटेनें येत असतां जयपूर, जोधपूर, उदेपूर वगैरे ठिकाणच्या राजांचीं राजकारणें आलीं त्यांच्या भेटी घेऊन महाराजांशीं सलोख्यानें वागण्याचा त्यांच्याशीं तह केला, व अशा रीतीनें रजपूत लोकांशीं सख्य केलें. पहिले बाजीराव यांनीं पुढें उत्तरहिंदुस्थानांत ज्या स्वाऱ्या केल्या व राजा जयसिंग याच्याशीं जो त्यांचा विशेष स्नेह जमला, त्याचें मुख्य कारण नानांच्या ह्याच भेटी होत. नाना साताऱ्यास आल्यावर महाराज त्यांस सामोरे गेले व त्यांचा त्यांनीं मोठा गौरव केला. त्या वेळीं नानांस किती धन्यता वाटली असेल त्याची वाचकांनीं कल्पनाच केली पाहिजे! महाराजांनीं ह्या कामगिरीबद्दल नानांस करडें[१], रांजणगांव[१] वगैरे पांच महालांचें सरदेशमुखीचें वतन करून दिलें, व दुसरें गांव इनाम दिले. संताजी भोंसले दिल्लीस लढाईंत पडला तेव्हां त्याचा पुत्र राणोजी भोंसले यानें त्या लढाईंत तरवार गाजविली होती म्हणून त्यास सवाई संताजी हा किताब दिला; व ज्यांनीं ज्यांनीं मर्दुमकीचीं कामें केलीं

१ पुणें जिल्ह्यांत घोडनदीपासून ३।४ कोसांच्या अंतरांत हीं गांवें आहेत. रांजणगांव येथें गणपतीचें प्रसिद्ध देवालय आहे.

होतीं त्यांस बक्षिसें, गांव, इनामें वगैरे देऊन संतुष्ट केलें. खंडेराव दाभाडे सेनापति याच्याकडील अधिकार वाढविला व दमाजी गायकवाड म्हणून एक सरदार त्याच्या पदरीं होता त्याच्या कर्तृत्वाबद्दल, शहाणपणाबद्दल व शौर्याबद्दल महाराजांनीं त्यास समशेरबहाद्दर असा किताब दिला.

नाना दिल्लीस सय्यदांचे मदतीस गेले त्या वेळीं त्यांनीं अंबाजीपंत पुरंदरे यास आपला मुतालीक नेमिलें होतें व त्याच्या स्वाधीन शिक्कामोर्तब करून ठेविलें होतें. नाना परत येत तोंपर्यंत अंबाजीपंतानें तें काम मोठ्या दक्षतेनें केलें. सातान्यास आल्यावर नानांनीं आपलें सर्व लक्ष राज्याची अंतःस्थिति सुधारण्याकडे लाविलें. त्या वेळीं जमाबंदीची कांहींच शिस्त ठरलेली नव्हती, त्याचप्रमाणें एकंदर वसूल निरनिराळ्या हक्कदारांस कोणत्या रीतीनें वांटून द्यावयाचा त्याचाही नियम ठरला नव्हता, व त्यामुळें वारंवार तंटे उपस्थित होत असत. नानांनीं एकंदर जमाबंदीखात्याची बारीक रीतीनें तपासणी केली व फार मेहनतीनें व अक्कलहुशारीनें त्या संबंधाचे नवीन नियम करून टाकले. त्यामुळें जमाबंदीची शिस्त फार उत्तम तऱ्हेनें लागून अव्यवस्थेचा सर्व प्रकार बंद झाला. ते नियम येणेंप्रमाणें:—

( १ ) सरदेशमुखीचें उत्पन्न—हें राजाचें वतन. यावर गादीचे मालकाशिवाय दुसरे कोणाचा हक्क नाहीं.

( २ ) बाकी सर्व हक्क मिळून जें उत्पन्न तें स्वराज्य.

( अ ) यांतील शेंकडा २५ प्रमाणें विभाग

गादीचे मालकाचा. याचें नांव राजबाबती.

(आ) बाकी शेंकडा ७५ उरले. तो मोकासा. यापैकीं साहोत्रा ( सर्व स्वराज्यापैकीं शेंकडा ६ प्रमाणें ) विभाग पंत सचिव यांचा.

( इ ) बाकी शेंकडा ६९ राहिले. तो ऐन मोकासा. यापैकीं नाडगौडा ( स्वराज्यावर शेंकडा ३ प्रमाणें ) विभाग. तो राजाचे इच्छेनुरूप पाहिजे त्यास द्यावा.

( ई ) बाकी शेंकडा ६६ उरले. ते निरनिराळे सरदार लोकांस जहागिरी देण्यांत खर्च व्हावे.

( ३ ) राजबाबती वसूल करण्याचें काम पेशवे, प्रतिनिधि व सचिव यांजकडे असावें.

मोकासा सचिव यांनीं वसूल करून घ्यावा; व लांबलांबच्या गांवीं हा वसूल उत्पन्न करण्याकरतां राजानें आपले कामगार पाठवावे. नाडगौडा ज्याला दिला असेल त्यानें वसूल करावा. जहागीर ज्याची त्यानें वसूल करावी.

( ४ ) सरदार लोकांस एकमेकांच्या मुलखांत त्या त्या मुलखाच्या उत्पन्नाच्या विभागावर, किंवा तेथील गांवच्या उत्पन्नावर कांहीं हक्क मिळावे.

अशी उत्पन्न विभागण्याची व त्याच्या वसलाची

शिस्त लावून दिल्यामुळें मराठे सरदारांत एकाचा जो फायदा तोच दुसऱ्याचा असें झालें; व त्यांच्यांत फाटाफूट होऊन जी बंडाळी नेहमीं चालत असे ती बंद होऊन आपापले हक्क ज्यास्त वाढविण्याकरितां त्यांना मोठें उत्तेजन आलें. पुढें कांहीं दिवसांनीं मराठ्यांच्या राज्यविस्ताराच्या पारंब्या जिकडे तिकडे फुटूं लागल्या त्याचें कारण नानांनीं घालून दिलेली उत्पन्न विभागण्याची वरील पद्धतच होय. ही पद्धत पूर्वी अंशतः चालू होती; परंतु तिच्यांत योग्य ते फेरफार करून सुधारण्याचें व ती पूर्णपणें अमलांत आणण्याचें सर्व श्रेय नानांसच दिलें पाहिजे.

परंतु वर सांगितलेली व्यवस्था लावण्यांत नानांस जे श्रम पडले व त्यांना जी दगदग सोसावी लागली व तेणेंकरून त्यांना जो थकवा आला त्या योगानें त्यांच्या प्रकृतीस विकृति झाली. त्यांना तापानें फार हैराण केलें व ते दिवसेंदिवस क्षीण होत चालले. नंतर हवापालट करण्याकरतां महाराजांचे आज्ञेनें ते सासवडास येऊन राहिले. परंतु त्या ठिकाणींही त्यांना आराम न पडतां त्यांचें दुखणें विकोपास गेलें. सर्व औषधी उपाय हरले. शेवटीं इ० स० १७२० च्या अक्टोबर[१] महिन्यांत त्यांच्यावर दुष्ट काळाचा घाला येऊन पडला!

---

१ पुणें–दप्तरांतील एका दाखल्यावरून नाना सन १७२१ च्या एप्रिल महिन्यांत वारले असावे असें दिसून येतें. परंतु ती चुकी आहे. नानांचा ज्येष्ठ पुत्र बाजीराव यास कांहीं कारणामुळें पुढें सात महिन्यांनीं म्हणजे १७२१ च्या एप्रिल किंवा मेच्या सुमारास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं, यामुळें त्यांच्या मृत्यूची तारीख पुढें गेली असावी.

# भाग पांचवा.

## उपसंहार.

नानांच्या चरित्राच्या संबंधानें त्यांची पूर्ववयांतील हकीकत कांहींच उपलब्ध नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ते इ० स० १७०७ च्या सुमारास जिवाच्या भीतीनें कोंकण सोडून घांटावर आले व सन १७०८ त त्यांनीं धनाजी जाधव याच्या पदरीं नोकरी धरिली व अशा रीतीनें त्यांचा मराठी दरबारांत प्रवेश झाला. धनाजीनें नानांची ज्या कामावर योजना केली होती तें काम त्यांनीं मोठ्या दक्षतेनें, इमानेंइतबारें, व नियमितपणें केल्यामुळें त्याची मर्जी नानांवर सुप्रसन्न झाली, व त्यांच्या कर्तृत्वशक्तीबद्दल व शहाणपणाबद्दल तो वारंवार शाहू महाराजांजवळ नानांची तारीफ करीत असे. यामुळें महाराजांचेही मनांत नानांविषयीं प्रेमबुद्धि उत्पन्न झाली होती. इ० स० १७१० त धनाजी निवर्तल्यावर त्याचा मुलगा चंद्रसेन यास महाराजांनीं सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. परंतु धनाजीकडे जमाबंदीचा दुसरा अधिकार होता तो मात्र चंद्रसेनास न देतां त्यांनीं त्यावर नानांची स्वतंत्र रीतीनें नेमणूक केली. या गोष्टीचें चंद्रसेनास वाईट वाटून पुढें तो व नाना यांच्यांत जो तंटा उपस्थित झाला त्यांत शाहू महाराजांनीं नानांस हातीं धरून जाधवापासून त्यांचें संरक्षण केलें. ह्याचीं मुख्य कारणें पाहूं गेलें तर शरणागताचें रक्षण हें एक,

व दुसरें नानांच्या हुशारीबद्दल महाराजांची पूर्वींच खात्री झालेली होती व त्यांच्या हातून आपणास पुढें मोठमोठीं कामें करून घेतां येतील असेंही त्या वेळीं त्यांना वाटलें असावें; नाहीं तर त्या वेळीं साधारण कारकुनीचा पेशा करीत असलेल्या नानांस पाठीशीं घालून चंद्रसेनासारखा शूर सेनापति व त्या वेळच्या महाराजांच्या राज्याचा एक खंबीर आधारस्तंभ त्यांनीं गमाविला नसता. नानांच्या शौर्याविषयीं विशेष प्रसिद्धि नाहीं; तथापि त्यांच्या कारकीर्दींत ज्या लढाया झाल्या त्यांपैकीं बहुतेक लढायांत तेच प्रमुख होते. पुरंदराजवळ चंद्रसेन जाधव व हैबतराव निंबाळकर यांची जी लढाई झाली तींत हैबतरावाच्या मदतीकरतां नाना गेले होते; कृष्णराव खटावकरासारख्या पुंडाचा त्यांनींच पराजय केला; कान्होजी आंग्र्यासारख्या बलिष्ट वीराशीं प्रसंगविशेषीं सामना देऊन व मुख्यतः युक्तीच्या मार्गाचें अवलंबन करून त्याला महाराजांच्या पक्षास त्यांनींच सामील करून घेतलें, व बहिरोपंत पिंगळे पेशवे यास कान्होजीनें कैद केलें होतें त्याची मुक्तता त्यांनींच केली; दमाजी थोरातासारख्या विश्वासघातकी बंडखोरास लढाईंत जर्जर करून त्यांनींच कैद केलें व शेवटीं १० हजार फौजेनिशीं सय्यद बंधूंच्या मदतीस दिल्लीस जाऊन, बादशाही पक्ष जोरांत होता तथापि त्याचें कांहीं चालूं न देतां शिवाजीमहाराजांपासून ज्या चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य या हक्कांच्या सनदा दिल्लीच्या बादशाहापासून प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न चालला होता त्या सनदा नानांनींच आणल्या. त्याचप्रमाणें चंद्रसेन जाध-

वापासून नानांचें रक्षण करावें म्हणून खंडो बल्लाळ चिट-णीस यांनीं महाराजांस विनंति केली त्या वेळीं " शिपाई मोठे धाडसाचे " असें त्यांनीं नानांविषयीं म्हटलें आहे. या एकंदर गोष्टींवरून नानांचे अंगीं शिपाईगिरीचा बाणा पूर्णपणें वसत असून एखादी मोहीम अंगावर घेऊन ती चालवावी कशी याची त्यांना पूर्ण माहिती होती. नाहीं तर एवढ्या मोठमोठ्या कामगिऱ्या इतक्या सुर-क्षीतपणें त्यांच्या हातून पार पडल्या नसत्या. तथापि त्यांच्या एकंदर राज्यपद्धतीवरून असें दिसून येतें कीं, होतां होईल तों लढाईचा प्रसंग टाळून युक्तीच्या मार्गानें आपला कार्यभाग उरकून घेणें त्यांना ज्यास्त आवडत होतें.

ज्याप्रमाणें प्रतापशाली थोरले शिवाजी महाराज, व शाहूमहाराज यांना मनुष्याच्या आंगच्या गुणांची खरी पारख असल्यामुळें त्यांनीं तशाच मनुष्यांस आपल्या पदरीं ठेविलें होतें, त्याचप्रमाणें नानांसही मनुष्याची खरी पारख होती व त्यांनींही तशाच गुणी मनुष्यांचा आपल्या पदरीं संग्रह करून ठेविला होता. विशेषतः ज्या दोन सरदा-रांच्या जिवावर नानांचे नातू रणशूर रघुनाथराव ऊर्फ दादा साहेब यांनीं पुढें मराठ्यांचा भगवा झेंडा अट-केच्याही पलीकडे फडकाविला त्यांपैकीं शिंद्यांचा मूळ पुरुष राणोजी हा नानांच्या पदरीं हुजऱ्या होता व होळकरांचा मूळ पुरुष मल्हारराव हा नाना दिल्लीस सय्यदांचे मदतीस गेले त्या वेळीं त्यांच्या फौजेंत एक बारगीर होता. पहिले बाजीराव साहेब यांनीं पुढें उत्तर हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून तिकडे मरा-

ठ्यांचे जे हक्क बसविले ते याच दोन सरदारांच्या जिवावर बसविले.

**नानां**स पेशवाईचा उपभोग इ० स० १७१४-१७२० पर्यंत ह्मणजे फक्त ६ वर्षेच मिळाला. परंतु एवढ्याशा थोडक्या अवकाशांत त्यांनीं जीं जीं महत्त्वाचीं कामें केलीं तीं लक्षांत आणिलीं तर त्यांच्या शहाणपणाची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. त्यांना राज्याची अंत:स्थिति सुधारण्यास अवकाशच मिळाला नाहीं. तथापि त्यांनीं राज्यांतील जमीन फार हलक्या कौलानें कुळांस देऊन तिची लागवड करविली व अशा रीतीनें शेतकीस उत्तेजन दिलें. त्याचप्रमाणें जमाबंदीखात्यांत जो धरबंध नव्हता त्याची शिस्त फार उत्तम तऱ्हेनें लावून दिली. **शाहू**-महाराजांचा दुर्बल पक्ष जोरांत आणण्यास मुख्य मदत **नानां**ची होय ही गोष्ट पाहिजे तो मनुष्य कबूल करील. शेवटीं शेवटीं **नानां**वर महाराजांची इतकी भक्ति बसली कीं त्यांनीं राज्याचीं सर्व सूत्रें **नानां**च्या गळ्यांत अडकवून देऊन आपण राज्याच्या दगदगीपासून दूर झाले. राजा कितीही हुषार असला तथापि त्याला मंत्रीही हुषारच लागतो; व **शाहू**महाराजांसारख्या राजविलासी राजाच्या राज्यांत तशा मंत्र्याशिवाय कधींच चालावयाचें नाहीं, व त्यांच्या सुदैवानें त्यांनाही तशींच माणसें मिळत गेलीं. असो.

**नानां**च्या मृत्यूचें वर्तमान साताऱ्यास येऊन पोहोंचलें त्या वेळीं शहरवासी लोकांस अपरंपार दु:ख झालें. **शाहू**-महाराजांस तर आज आपल्या राज्याचा आधार तुटला असें वाटूं लागलें. त्यांना **नानां**च्या मृत्यूमुळें फार वाईट

वाटलें. परंतु उपयोग काय? राजा असो किंवा रंक असो, मृत्यूनें कोणास सोडलें आहे असें नाहीं. यास्तव नानांप्रमाणें, रामदासाच्या खालीं दिलेल्या उक्तीस अनुसरून प्रत्येक सुमनुष्यानें आपला वर्तनक्रम ठेवावा अशी प्रार्थना करून आम्हीं वाचकांची रजा घेतों.

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेंचि क्रिया धरावी ॥

समाप्त

## मे० डायरेक्टर साहेब बहादूर, विद्याखातें, यांनीं मंजूर केलेलीं पुस्तकें.

[ बक्षीस देण्याकरितां व लायब्रऱ्यांकरितां मंजूर केलेलीं. ]

| पुस्तकाचें नांव. | किंमत. |
| --- | --- |
| १. छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र ( छत्रपतींची तसबीर व हिंदुस्थानाचा नकाशा यांसह. ) .... .... | १ऽ८ |
| २. शिक्षणसार. .... .... .... .... | ऽ७ |
| ३. नीतिबोध. .... .... .... .... | ऽ८ |
| ४, ५, ६. गलिव्हरचा वृत्तांत—भाग १, २ व ३. ( सचित्र ) प्रत्येकीं .... .... | ऽ५ |
| ७. सदर भाग ४ .... .... .... .... | ऽ६ |

[ फक्त बक्षीस देण्याकरितां मंजूर केलेलीं. ]

| | |
| --- | --- |
| ८. डॉ० स्विफ्ट् याचें चरित्र. .... .... | ऽ३ |
| ९. नऊ रत्नें. .... .... .... .... | ऽ२ |
| १०. मुलांस नवी देणगी. .... .... .... | ऽ२ |
| ११, १२, १३. सुबोध गोष्टी—भाग १, २ व ३. प्रत्येकीं. .... .... .... .... | ऽ२ |
| १४. सायंकाळची करमणूक. .... .... | ऽ६ |
| १५. थोरांच्या आख्यायिका. .... | ऽ१ऽ६ |

☞ वरील सर्व पुस्तकें, नवीन किताबखाना, बुधवार पेठ, पुणें, येथें विकत मिळतील.